POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२१३ ● मुंबई, शनिवार, ०७ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA





## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून राज्याचा अर्थसंकल्प सादर

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.६) महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात त्यांनी आर्थिक, सांस्कृतिक, ग्रामीण आणि शहरी क्षेत्रांमध्ये विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची घोषणा केली. या बजेटमध्ये संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्राचा विकास, ग्रामीण समृद्धी आणि अक आधारित उन्नत ग्राम योजना, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज व मराठा शौर्य स्मारक, तसेच ऑलिंपिक खेळांसाठी हाय परफॉर्मन्स सेंटर यांसारख्या अनेक उपक्रमांचा समावेश आहे.

शहरी पायाभूत सुविधांमध्ये मेट्रो नेटवर्क विस्तार, भूयारी मार्गांचे आधुनिकीकरण, मुंबई महानगर प्रदेशातील पुनर्विकास आणि नवीन आर्थिक केंद्रांची निर्मिती यांवरही अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. शेतकरी, महिला, खेळाडू, साहित्यप्रेमी व सामान्य नागरिकांसाठी आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रकल्प या बजेटद्वारे साकार होणार आहेत.

### अर्थसंकल्पात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या महत्त्वाच्या घोषणा

- राष्ट्रीय संत श्री गाडगेबाबा यांचे जन्मस्थान, कर्मभूमी व समाधी यांना जोडणाऱ्या संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सकिटचा विकास करणार
- संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान सुरु करणार
- कृत्रिम बुद्धीमत्तेच्या मदतीने नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजना राबवणार
- महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त चवदार तळे, महाड येथील पायाभूत सोयीसुविधांकरीता विकास आराखडा तयार करणार
- हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या राष्ट्रीय स्मारकाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम जून २०२६ पर्यंत पूर्ण करणार
- अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारणार
- शेतकऱ्यांच्या हितार्थ विविध उपाययोजना : अॅग्रीस्टॅकवर १ कोटीपेक्षा अधिक शेतकऱ्यांची नोंदणी, विविध योजनांचा पारदर्शक पद्धतीने लाभ यात आदिवासी वनपट्टेधारक शेतकरी यांचाही समावेश असणार, सकस व पोषणयुक्त शेती उत्पादनासाठी 'महाराष्ट्र प्राकृतिक शेती अभियान' राबविणार तसेच ५ लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट, स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचा समावेश करणार.
- नाशिक येथे रामकाल पथ विकास प्रकल्पउभारणार, राज्यातील तिसरी चित्रनगरी नवरगाव, रामटेक (नागपूर) येथे विकसित करणार, रामटेक (नागपूर) येथे रामसृष्टी व कालिदास सृष्टी उभारली जाणार तसेच महाकवी कालिदास यांच्या जीवनावर आधारित चित्रपट तयार करणार.
- महात्मा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी भव्य स्मारक उभारणार.
- ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथे स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे.
- आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, पानिपत येथे मराठा शौर्य स्मारक उभारणार
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अॅकेडमी स्थापन करणार
- मराठी भाषेतील साहित्य इतर भाषांमध्ये आणि इतर भाषांमधील साहित्य मराठी भाषेत अुवादित करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अॅकेडमी स्थापन करणार
- ऑलिम्पिक खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी हाय परफॉर्मन्स सेंटर सुरू करणार
- जिल्हा, तालुका स्तरावरील क्रीडा केंद्राच्या विकासासाठी आर्थिक तरतूद
- खेळाडूंसाठी मिशन अॅथलेटिक्स योजना सुरू करणार
- १२ खेळांचे राज्यस्तरावर केंद्र उभारणार
- विविध मेट्रो प्रकल्पांना मंजुरी : मुंबई, पुणे व नागपूर - ४९० किमी मेट्रोचे जाळे, १७३ किमीच्या मार्गिका खुल्या, येत्या वर्षात ५० किमीचे नियोजन, २०२९ पर्यंत आणखी १६५ किमीचे नियोजन
- मुंबई मेट्रो ११ (पूर्णतः भूमिगत) वडाळा ते गेट वे ऑफ इंडिया, पुढे धारावी पुनर्वसन प्रकल्प -वांद्रे टर्मिनसपर्यंतचे नियोजन
- मुंबई मेट्रो ८- मुंबई व नवी मुंबई विमानतळांना जोडणारा मार्ग, नवी मुंबई मेट्रो २ - तळोजा ते खांदेश्वर
- पुणे मेट्रो (टप्पा २) : खडकवासला स्वारगेट हडपसर खराडी मार्गावर हडपसर ते लोणी काळभोर व हडपसर बस डेपो ते सासवड या दोन उपमार्गिकांना मान्यता. रामवाडी ते वाघोली ११ किमी मेट्रो प्रकल्पास मान्यता
- नवीन नागपूर-व्यापार व वित्तीय केंद्रः नागपूर शहराच्या आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी नवीन नागपूर या नावाने व्यापार व वित्तीय केंद्र विकसित करणार
- नागपूर शहराच्या विस्तार व विकासाला चालना देण्यासाठी नागपूर रिंगरोडला मान्यता
- मुंबई महानगर प्रदेश - विकासाचे केंद्रः वाढवण, पालघर येथे चौथी मुंबई वसविणारः लॉजिस्टिक्स व वेअर हाऊसिंगसाठी विकास केंद्रांची निर्मिती, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत २० लाख झोपडपट्टी घरांच्या पुनर्विकासासाठी तसेच १० लाख परवडणारी घरे विकसित करण्यासाठी आराखडा तयार करणार
- मुंबई महानगर येथे नवीन बेकायदेशीर बांधकामे रोखण्यासाठी जीआयएस तंत्रज्ञानाचा वापर करुन 'नो न्यू स्लम फ्रेमवर्क' विकसित करणार तसेच इतर शहरांमध्येही पुढे लागू होणार
- मुंबई महानगराच्या धर्तीवर 'पुणे, नाशिक, नागपूर व छत्रपती संभाजीनगर ग्रोथ हब' साठी नीती आयोग रोड मॅप तयार करणार
- वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी भूयारी मार्गः मुंबईतील ऑरेंज गेट, पूर्व मुक्कमार्ग ते मरीज ड्राईव्ह दरम्यान भूयारी मार्ग डिसेंबर, २०२८ पर्यंत पूर्ण करणार, पूर्व व पश्चिम मुंबईला जोडणाऱ्या गोरेगाव- मुलुंड भूयारी मार्गाच्या पहिल्या टप्प्याचे काम अंतिम स्तरावर, ठाणे - बोरिवली या भूयारी मागार्चे काम जून, २०२८ पर्यंत पूर्ण करणार
- खारघर तुर्भे या ₹.२१०० कोटींच्या भूयारी मागार्चे काम सप्टेंबर, २०२८ पर्यंत पूर्ण करणार
- एकात्मिक भूयारी मार्ग रस्ता प्रकल्प अंतर्गत वांद्रे वरळी सागरी सेतू ते बुलेट ट्रेन स्थानक व वांद्रे-कुर्ला संकुल ते मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडण्यात येणार
- गायमुख फाउंटन हॉटेल ६ किमी भूयारी मार्ग आणि फाउंटन हॉटेल - भाईंदर ९ किमी उन्नत मार्ग प्रस्तावित पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा, ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर आधारित ३०० कोटी वृक्ष लागवडीची मोहीम राबविणार
- २०४७ मधील पाण्याची संभाव्य गरज विचारात घेऊन पाणी उपलब्धतेची सुनिश्चिती, जल संपत्तीची प्रमाणित व ऑनलाईन माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नाशिक येथे ₹.७१.२० कोटी खर्च करून राज्य जल माहिती केंद्र स्थापन करणार
- वैनगंगा - मळगंगा योजने अंतर्गत ₹.९४,९६८ कोटी किमतीच्या प्रकल्पास मान्यता
- वैतरणा व उल्हास खोऱ्यातील ५४ टीएमसी अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे प्रस्तावित
- दमणगंगा- वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पातील ₹.१३,४९७ कोटी किमतीच्या कामास मान्यता
- नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पातील ₹.७४६५ कोटी किमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता
- दमणगंगा- एकदरे-गोदावरी नदी जोड प्रकल्पातील ₹.२२१३ कोटींच्या कामास मान्यता
- बारामती व पुरंदर तालुक्यातील दुष्काळी क्षेत्रास पाणी उपलब्ध करून देण्याकरिता निरा - कऱ्हानदीजोड प्रकल्प राबविणार
- परदेशी नोकरीच्या संधी : जागतिक बँकेच्या सहकायार्ने 'दक्ष' महत्त्वकांक्षी प्रकल्प राबविणार
- महिमा (महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अॅण्ड अॅडव्हान्समेन्ट) संस्थेची स्थापना करणार
- तरुणांना परदेशातील नोकऱ्यांसाठी आवश्यक भाषा, कौशल्य प्रशिक्षण आणि आर्थिक मार्गदर्शन देणार
- राज्यातील समुपदेशन सेवांचा विस्तार करण्यासाठी ३६ नवदिशा केंद्रे स्थापन करणार

## नवीन कामगार कायद्यानुसार कारवाई होणार... नागपूर स्फोटप्रकरणी कामगार मंत्र्यांची विधानसभेत माहिती

■नागपूर्र। प्रतिनिधी,

नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील राऊळगाव येथील एसबीएल एनर्जी लिमिटेड या स्फोटक निर्मिती करणाऱ्या कारखान्यामध्यील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ही कंपनी बंद केली आहे. या प्रकरणात मालकासह २१ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. या पुढे केवळ नोटीस देऊन न थांबता, सुरक्षेच्या त्रुटी आढळल्यास थेट कंपनी बंद करण्याचे अधिकार नवीन कामगार कायद्यान्वये प्राप्त होणार आहेत. या प्रकरणात कामगार विभागातील अधिकाऱ्यांचीही चौकशी करणार, असे लक्षवेधीला उत्तर देताना कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी विधानसभेत सांगितले.

नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील राऊळगाव येथील एसबीएल एनर्जी लिमिटेड या स्फोटक निर्मिती करणाऱ्या कंपनीत स्फोट होऊन १८ कामगारांचा मृत्यू झाला.

या संदर्भात लक्षवेधी अतुल भातखळकर यांनी विधानसभेत मांडली. कामगारमंत्री फुंडकर म्हणाले की, या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन या घटनेची चौकशी सुरू आहे. यामध्ये दोषी आढळतील त्यांच्यावर ३०२ चे गुन्हे दाखल करू. शासन या प्रकरणात संवेदनशील असून या प्रकरणात दोषींची गय केली जाणार नाही. या प्रश्नाच्या चर्चेत विधानसभा सदस्य नाना पटोले, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, चरणसिंह ठाकूर, समीर कुणावार, संजय मेश्राम यांनी सहभाग घेतला.

### ...तर सरकारला कंपन्या बंद करण्याचे अधिकार



**मालकासह २१ जणांवर मनुष्यवधाचा गुन्हा**

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून महसूल मंत्री यांनी 'पेसो' पेट्रोलियम अँड एक्स्प्लोझिव्ह सेफ्टी ऑरगनायझेशन या केंद्रीय विभागाशी चर्चा केली आहे. केंद्र आणि सरकारच्या प्रयत्नातून सर्व घातक कारखान्यांचे ऑडिट करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मार्गदर्शक सूचनांचे पालनासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. नागपूर प्रकरणात मालकासहित २१ जणांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

नागपूर स्फोट दुर्घटनेमुळे कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा कंपन्यांच्या मालकांच्या मनमानीला आळा घालणे नवीन कामगार कायद्यामुळे शक्य होणार आहे.

**त्रुटींची माहिती बोर्डवर लावणे बंधनकारक**

या स्फोटाच्या घटनेनंतर महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या प्रकरणात मालकासह २१ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. "एका व्यक्तीला कंपनीत डायरेक्टर करून जबाबदारी झटकण्याची पद्धत आता चालणार नाही. सध्याच्या कामगार कायद्यानुसार त्रुटी आढळल्यास केवळ नोटीस देणे किंवा खटला दाखल करण्याचे मर्यादित अधिकार आहेत. मात्र, आगामी नवीन कामगार कायद्यान्वये, कामगारांच्या जीवाशी खेळणाऱ्या कंपन्यांना थेट टाळे ठोकण्याचे अधिकार प्रशासनाला मिळणार आहेत. कारखान्यातील सुरक्षेच्या त्रुटी केवळ अधिकाऱ्यांच्या रेकॉर्डवर राहू नयेत, तर त्या प्रत्यक्ष कामगारांना माहीत असणे आवश्यक आहे. यासाठी नवीन नियमांची अंमलबजावणी केली जाईल. कारखान्यातील त्रुटींची माहिती कंपनीच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करणे अनिवार्य असेल. सुरक्षेच्या तपासणीवेळी कामगारांचा प्रतिनिधी उपस्थित असेल. सुरक्षेबाबतच्या सूचना आणि त्रुटींची माहिती कामगारांना मिळाल्याची खात्री केली जाईल, असे जयस्वाल यांनी सांगितले.

## 'वाहतूकदारांनी राज्यव्यापी संप मागे घेतला'

■मुंबई। प्रतिनिधी,

अन्यायकारक इ-चलान रद्द करण्याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे आश्वासन देत तसेच वाहतूकदारांच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी लवकरच पोलीस व परिवहन विभागाची संयुक्त बैठक बोलावण्यात येणार असल्याची माहिती दिल्यानंतर राज्यातील विविध वाहतूकदार संघटनांनी पुकारलेला राज्यव्यापी संप मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्य व्यापी वाहतूकदारांच्या संपा संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली . तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुरदृष्य प्रणालीद्वारे वाहतूकदार संघटनांची शिखर समिती ' महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट अॅक्शन ' कमिटीच्या सदस्यांशी संवाद साधला. त्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीने शासन विचार करित आहे, तरी संप मागे घ्यावा असे आवाहन केले. त्या आव्हानाला प्रतिसाद देत वाहतूकदारांनी संप मागे घेतला आहे. तसेच , शासन वाहतुकदारांच्या विविध मागण्या संदर्भात संवेदनशील असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले . अन्यायकारक पद्धतीने काढण्यात आलेल्या इ-चलानांबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल तसेच संबंधित समस्यांवर चर्चा करण्यासाठी परिवहन विभाग व पोलीस प्रशासन आणि वाहतूकदार संघटनांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

## शाळेत टिळा लावून येण्यास मनाई... मुख्याध्यापकावर आरोप

### हिंदुत्त्ववादी कार्यकर्ते आक्रमक



■पुणे। प्रतिनिधी,

पुणे जिल्ह्यातील एका शाळेतून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. न्हावी या गावातील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना कपाळावर टिळा लावून शाळेत येण्यास विरोध केल्याचा आरोप मुख्याध्यापकावर करण्यात आला आहे. एस. एन. कांबळे असं या मुख्याध्यापकाचं नाव आहे. ही बाब समजताच हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी शाळेत जाऊन मुख्याध्यापकांना जाब विचारत गोंधळ घातला.

**टिळा लावून येण्यास विरोध**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाची न्हावी या गावात न्यू इंग्लिश स्कूल ही शाळा आहे. या शाळेचे मुख्याध्यापक एस. एन. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना टिळा लावून येण्यास विरोध केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. तसेच टिळा लावलेल्या विद्यार्थांना मुख्याध्यापक अपमानास्पद बोलल्याचा आरोपदेखील करण्यात आला. यामुळे जोरदार वाद होत असल्याचे पहायला मिळत आहे. यानंतर शिवप्रतिष्ठानच्या धारकऱ्यांसह हिंदुत्त्ववादी कार्यकर्ते शाळेत पोहोचले आणि मुख्याध्यापकांना जाब विचारत गोंधळ घातला.

**मुख्याध्यापकांचे स्पष्टीकरण**

यानंतर मुख्याध्यापकांनी यावर स्पष्टीकरण दिले. त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना टिळा लावण्यास कोणतेही बंध नाही. मात्र असा प्रकार पुन्हा झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा हिंदुत्त्ववादी कार्यकर्त्यांनी दिला आहे.

## मुंबईत अभियांत्रिकी विद्यार्थ्याला अटक

■मुंबई। प्रतिनिधी,

दहशतवादी संघटनांशी असलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) २१ वर्षीय अभियांत्रिकी विद्यार्थी अयान शेख याला अटक केली आहे. एटीएसने २ मार्च रोजी मुंबईतील कुर्ला, गोवंडी आणि शिवाजी नगर परिसरात छापे टाकले होते. हे छापे जैश-ए-मोहम्मद आणि इसिसच्या ऑनलाइन प्रचाराशी संबंधित विशिष्ट माहितीच्या आधारे टाकण्यात आले होते. या छाप्यांनंतर अयान शेखला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आणि नंतर अटक करण्यात आली. त्याच्यावर अनलॉफुल अॅक्टिव्हिटीज (प्रिव्हेन्शन) अॅक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान एटीएसने त्याच्या लॅपटॉप आणि मोबाइल फोनसह इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त केली आहेत, जी फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आली आहेत. अधिकाऱ्यांच्या मते, अयान शेख याने जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अझहरशी संबंधित ऑडिओ-व्हिडिओ क्लिप्स शेअर केल्या होत्या आणि त्याने दोन इतर अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना (त्याचे जवळचे मित्र) रॅडिकल कंटेंट दाखवून आणि टेलिग्राम ग्रुप्समध्ये जोडून प्रभावित करण्याचा प्रयत्न केला होता. अयान गेल्या ६ महिन्यांपासून मुंबईत 'जैश-ए-मोहम्मद'चा स्लीपर सेल म्हणून काम करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

## नाक आणि जीभ कापून 62 वर्षीय महिलेची निर्घृण हत्या

■मुंबई। प्रतिनिधी,

मध्य प्रदेशातील राजगड जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका 62 वर्षीय महिलेची निर्घृण हत्या करण्यात आली. या हत्येत वृद्ध महिलेचा छळ करण्यात आला. तिची जीभ आणि नाकावर वार करण्यात आले. संबंधित घटनेत क्रूरतेची परिसिमा पाहून पोलिसांनी डोकं धरलं. मृत महिलेचा मृतदेह गव्हाच्या शेतात रक्ताच्या थारोळ्यात आढळला होता. या घटनेनं परिसर हादरून गेल्याचं वृत्त आहे.

संबंधित घटना ही भोजपूर पोलीस ठाणे परिसरातील आहे. संबंधित वृद्ध महिला ही 30 वर्षांपासून तिच्या पतीसोबत गावापासून सुमारे एक किमी अंतरावर असलेल्या शेतातील झोपडीत राहत होती. दोन वर्षांपूर्वी तिच्या पतीच्या निधनानंतर ती तिच्या मुलांसह सुनेसोबत राहत होती. दरम्यान ही घटना मंगळवारी रात्री घडली तेव्हा महिलेचा मुलगा शेतात पाणी घालण्यासाठी गेला होता आणि तिची सून कामासाठी राजस्थानला गेली होती.

**रक्ताच्या थारोळ्यात वृद्ध महिलेचा मृतदेह**

बुधवारी सकाळी मुलगा परतला आणि आई झोपडीतून बेपत्ता होती, तेव्हा शोध सुरु करण्यात आला. वृद्ध महिला काही अंतरावर गव्हाच्या शेतात गंभीर जखमी झाली आणि रक्तस्त्राव झालेल्या अवस्थेत आढळून आली होती. रुग्णालयात दाखल करताना वाटेतच तिचा दुर्दैवी मृत्यू झाला.

**वृद्ध महिलेवर लैंगिक अत्याचाराचा संशय**

घटनास्थळी आढळलेल्या काही वस्तूंवरून महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा पोलिसांचा संशय आहे. पोलिसांनी अद्यापही याबाबत ठोस माहिती दिली नसल्याचे वृत्तमाध्यमाने सांगितलं. दरम्यान मृत व्यक्तीच्या शवविच्छेदनाचा अहवालाची वाट पाहिली जात आहे. भोजपूरच्या टीआय यांनी सांगितले की, संगीत शर्मा म्हणाल्या की, 'महिलेवर क्रूर अत्याचार केले. आम्ही पुरावे गोळा केलेत आणि मृताच्या नातवाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरु करण्यात आली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून दोन डॉक्टरांच्या पथकाने शवविच्छेदन केले. या घटनेचा प्रकार लवकर उघडकीस येईल', असं त्या म्हणाल्या.

## शिक्षकाचे आठवीच्या विद्यार्थिनीसोबत शरीरसंबंध, एकटेपणाचा घेतला फायदा... पालकांनी धडा घ्यावा असं प्रकरण

**पालकांनी लक्ष ठेवण्याची गरज**

अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटना वाढत असल्याने शाळा प्रशासनाने प्रत्येक महिन्यात शिक्षक - पालक मेळावा घ्यावा. यात पोलिस सहभाग घेऊन मार्गदर्शन करतील असे घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर बोलताना घारगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत थोरात यांनी म्हणलं आहे. पालकांनी आपल्या मुलांशी सातत्याने संवाद साधला पाहिजे. शाळेत काय होतं, याबद्दल विचारपूस केली पाहिजे असं संगोपनासंदर्भातील तज्ज्ञ सांगतात. पालकांनी मुलांशी अधिक अधिक संवाद साधल्यास अनेक गोष्टींवर या संवादामधून उपाय सापडतात, असंही सांगितलं जातं.

■पुणे। प्रतिनिधी,

संगमनेर शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या नात्याला काळिमा फासणारी घटना संगमनेर तालुक्यात समोर आली आहे. शाळेत मुलगी एकटी राहत असल्याच्या मानसिकतेचा गैरफायदा घेत तिच्याशी जवळीक वाढवत शिक्षकाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. आठवीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन ती गरोदर राहिल्यानंतर हा सारा प्रकार समोर आला. सदर प्रकरणामध्ये संगमनेर तालुक्यात घारगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने आरोपीला अटक केली आहे.

**14 महिने मुलीवर केले अत्याचार**

आरोपीचं नाव अमोल भोसले असं असून तो 23 वर्षांचा आहे. तो संगमनेरचा राहणारा आहे. त्याच्याविरोधात पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या तक्रारीमधील तपशीलानुसार, 10 डिसेंबर 2024 ते 16 जानेवारी 2026 या दरम्यान शिक्षकाने पीडित मुलीच्या घरी तिच्यावर वेळोवेळी अत्याचार केले. पिडित मुलगी ग्रामीण भागातील एका खासगी शाळेत सध्या आठवीत शिक्षण घेत आहे. ती तिच्या घरात एकटी राहत होती. पीडित मुलीने आपल्या जबाबामध्ये, "वडील माझ्यापेक्षा मोठ्या भावाचे जास्त लाड करत होते. त्यामुळे मला एकटेपणा वाटे. मी शाळेत एकटी राहत असे त्यामुळे सदर शिक्षकाने आपल्याला याबाबत कारण विचारले. पुढे शिक्षकाने आपल्याशी मैत्री वाढवली. आईच्या मोबाईलवर आपल्याशी संपर्क केला. त्यानंतर घरी येऊन आपल्यावर वारंवार अत्याचार केला," असं म्हटलं आहे.

**गरोदर असल्याचं समोर आलं**

शाळेत आणि वर्गात एकटी राहत होती. त्याचा गैरफायदा घेत शिक्षक भोसलेने पीडित मुलीशी सातवीत असल्यापासून मैत्री केली. पुढे तिच्या घरी जाऊन तिच्यावर अत्याचार केले. मुलीच्या पोटात वेदना होऊ लागल्यानंतर पुण्यातील रुग्णालयात तपासणी केल्यानंतर ती गर्भवती असल्याचे निदर्शनास आले असे फियार्दीत नमूद करण्यात आले आहे. मुलीकडे घडलेल्या प्रकाराबद्दल चौकशी केली असता तिने शिक्षक घरी येऊन आपल्याशी शरीरसंबंध ठेवत असल्याचं सांगितलं. त्यानंतर आरोपीला अटक करण्यात आलं आहे.



# संपादकीय



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## भारताला याचा विचार करावा लागेल




सध्या चालू असलेल्या इराणविरुद्ध अमेरिका-इस्रायल या देशांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर झाली आहे. युद्धाचा परिणाम ऊर्जा, वीज, तेल, सामुद्री व्यापार, अन्नधान्य, वाहतूक, चलन, गुंतवणूक आणि पुरवठा साखळी, अशा अनेक टप्प्यांवर झालेला आहे. भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. त्यामुळे तिलाही यात होरपळावे लागणारच! मध्यपूर्व हा जगातील तेल आणि नैसर्गिक वायू यांचा प्रमुख स्रोत आहे. स्ट्रेट ऑफ होर्मूझ या सामुद्रधुनीतून जगातील पाचव्या भागाइतक्या कच्च्या तेलाची वाहतूक होते. या भागात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने त्याचे तरंग जागतिक तेलबाजारापर्यंत उमटले आहेत. साहजिकच तेलाच्या किमतीत वाढ झाली. भारत अनुमाने ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो. आंतरराष्ट्रीय बाजारात किमती वाढल्याने भारताचा आयात खर्च आणि व्यापार तूट वाढून रुपयावर दबाव आला. याचे काही परिणाम दृश्यस्वरूपात दिसू लागले आहेत. जसे की, नौकेचा विमा खर्च वाढणे, इंधन दरवाढीची शक्यता निर्माण होणे, आयात खर्च वाढणे, व्यापाराच्या अंतर्गत कंटेनरचे भाडे वाढणे, माल पोचण्यास अधिक वेळ लागणे, निर्यात खर्च वाढणे आणि उद्योगांच्या नफ्यात घट होणे इत्यादी. शेअरबाजारानेही ऐतिहासिक नीचांक दाखवला आहे. त्यामुळे जागतिक गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांचा विचार करत आहेत. तेल आणि गॅस महाग झाल्यामुळे खतांचे दर वाढले. वाहतूक क्षेत्रावर अतिरिक्त भार आल्याने महागाई वाढण्याची चिन्हे आहेत. इराणमधून मोठ्या प्रमाणात सुका मेवा निर्यात केला जातो. ९० टक्के पिस्ता तर इराणमधूनच येतो. युद्धामुळे शेतीमालाशी संबंधित बऱ्याचशा उत्पादनांवर इराणने बंदी घातली आहे. त्यात सुका मेव्याचाही समावेश आहे. हे पहाता भविष्यात सुका मेवा उपलब्ध होण्यात मयार्दा येऊ शकतात. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी सांगितलेले परिणाम तर भयावहच आहेत. जळगावमधून आखाती देशांत मोठ्या प्रमाणात केळ्यांची निर्यात केली जाते. केळ्यांचे १०० हून अधिक कंटेनर जे.एन्.पी.टी. बंदरात अडकलेले आहेत. परिणामी पुष्कळ आर्थिक घसरण झाली आहे. केळी उत्पादक शेतकरी आणि व्यापारी चिंतेत आहेत. कांद्याचीही तीच स्थिती! कांद्याचे १६० कंटेनर सीमेवर अडकले आहेत. त्यामुळे कांद्याचे भाव गडगडले आहेत. असाच परिणाम द्राक्षे आणि डाळिंब यांच्यावरही झाला आहे. थोडक्यात काय, तर आयात-निर्यात यांचे प्रमाण शून्य झाले आहे. चाबहार बंदराच्या ठिकाणीही बराचसा शेतमाल खोळंबला आहे. तो पुढेही जात नाही आणि पुन्हा मागेही येत नाही. शेतकरी करणार काय ? शेतकरी मागणी करत आहेत की, एकतर युद्ध तरी लवकर थांबवावे किंवा सरकारने आम्हाला अनुदान द्यावे, तरच आम्ही जिवंत राहू शकतो. सरकारला अनुदान द्यायचे म्हटले, तरी आपल्या पदरचा पैसा त्यात ओतावा लागणार. मग राज्यात, पर्यायाने केंद्रात अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार, हे ओघाने आलेच. एखाद्या विभागाचा पैसा जरी अनुदानासाठी वळवला, तरी दुसरा विभाग विवंचनेत येणार. अशा स्थितीत भारतीय रिझर्व्ह बँकेला कठोर धोरण अवलंबावे लागू शकते. ही सर्व स्थिती पहाता जागतिक स्तरावरील आर्थिक संघषार्चा लपंडाव चालूच रहाणार आहे. आज एका देशाचे युद्ध, तर उद्या दुसरा देश त्यात उतरणार. त्यामुळे युद्धभूमीवर विराम होणे अवघड आहे. जिवंत रहाण्याची चिंता आज केवळ शेतकऱ्यांनाच भेडसावत आहे. युद्धाचे भविष्यातील दूरगामी परिणाम पहाता शेतमालच जर उपलब्ध झाला नाही, तर सामान्य माणूस खाणार काय? साहजिकच त्याच्यासमोर जीवन-मरणाचा प्रश्नच निर्माण होणार. अन्नच मिळाले नाही, तर श्रीमंत असो किंवा गरीब यांना विवंचनेच्या एकाच सीमेवर यावे लागेल. याला सामोरे जाण्यास भारत सिद्ध आहे का? याचा गांभीर्याने विचार करावा लागेल. भारताकडे सध्या अनुमाने ४० ते ४५ दिवस पुरेल, इतका तेलसाठा शेष आहे. इतक्यावरच अवलंबून राहून चालणार नाही. आपल्याला दीर्घकालीन विचार करता अधिक साठा आवश्यक आहे. 'सध्या अनेक ठिकाणी तेलाचा तुटवडा भासत आहे', अशी आवई विरोधकांकडून उठवली जात आहे. ही केवळ आवई नव्हे, तर रचण्यात आलेले खोटे कथानक (नॅरेटिव्ह) आहे. युद्ध परिस्थितीत खरेतर असा प्रकार होणे निंदनीय आहे. भारत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत असल्याने त्याचा पर्यायी नियोजनावर भर आहेच. त्यामुळे रणनीती ठरवणे, उत्पादित पदार्थांची साठवणूक करणे अशा मार्गांनीही प्रयत्न चालू आहेत. अन्य राष्ट्रांवर अवलंबून न रहाता भारत स्वावलंबी होण्यासाठी उपाययोजना काढत आहे. भारताची अर्थव्यवस्थेतील भरारी पहाता भारत तेलसाठ्याची पूर्तता करील, हे निश्चित! रशियानेही भारताला तेलपुरवठा करण्यास सिद्ध असल्याचे सांगितले आहे. ही स्थिती पहाता भविष्यात खोटी कथानके रचली जाऊ नयेत, यासाठी भारताने आतापासूनच नियंत्रण ठेवायला हवे. भविष्यात कोणती दक्षता घ्यावी, या दृष्टीने विचार करणे चांगलेच आहे; पण देशद्रोही विचार पसरवणे टाळावे. भारताचे इराणशी चांगले ऊर्जा संबंध आहेत. भारताचे इस्रायलशी संरक्षणामध्ये सहकार्य, तर अमेरिकेशी धोरणात्मक भागीदारी आहे. तिन्ही देशांशी आपली नाळ जुळलेली आहे. त्यामुळे वेडेवाकडे पाऊल न उचलता भारताला संतुलित भूमिका घ्यावी लागेल. एकाचे जरी समर्थन केले, तरी त्याचा प्रतिकूल परिणाम व्यापार आणि आंतरराष्ट्रीय संबंध यांवर होऊ शकतो. त्यामुळे भारताने सावधगिरी बाळगावी. भारतासाठी ही परिस्थिती आव्हानात्मक आहे. सद्यःस्थिती पहाता तिसरे महायुद्ध अटळच आहे. तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असणाऱ्या भारताला युद्धपरिस्थितीत होरपळावे लागू नये, तसेच राष्ट्राची राखरांगोळी होऊ नये, यासाठी भारताने आत्मनिर्भर राहून ऊर्जा संक्रमण आणि उत्पादन वाढ यांवर भर द्यावा. अधिक सक्षम अर्थव्यवस्था निर्माण करण्याकडे लक्ष केंद्रित करावे. भारताच्या आर्थिक विकासाचा आलेख उंचावला की, अनेक गोष्टी सहजसोप्या होऊ शकतात. वेळप्रसंगी दबावगटाचा वापर करून अन्य राष्ट्रांनाही स्वतःच्या बाजूने वळवावे लागेल, तसेच खासगी आस्थापनांना अनुदानाद्वारे प्रोत्साहित करावे लागेल. युद्धपूर्व परिस्थितीत कोणती दक्षता घ्यावी? आपत्कालीन स्थितीचा सामना कसा करावा? याचे प्रशिक्षण नागरिकांनाही द्यावे, म्हणजे प्राप्त परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी त्यांचेही मनोबल वाढेल. दीर्घकालीन धोरणात्मक दृष्टीकोन राबवल्यासच जागतिक अस्थिरतेच्या काळातही भारत स्थिर आणि सक्षम राहील, हे निश्चित!

## आशा आणि आव्हाने



अर्थसंकल्पाच्या पूर्वदिनी राज्याच्या वर्तमानस्थितीतले वास्तव मांडून भविष्याचा वेध घेणारा हा अहवाल मांडण्याचा प्रघात आहे. त्यानुसार विधिमंडळात सादर झालेल्या अहवालामध्ये राज्याच्या प्रगतीचे गुलाबी चित्र रंगवण्यात आले असून, सध्याप्रमाणेच भविष्यातही महाराष्ट्राचे देशातील अव्वल स्थान कायम राहण्याचा व्यक्त झालेला विश्वास राज्याची आजवरची वाटचाल पाहता सार्थच म्हणावा लागेल.

आर्थिक विकास, गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा अशा आघाड्यांवर गतिमान प्रवासाचा दिलासा आणि दुसरीकडे तिजोरीवरील वाढता कर्जभार, शहरी-ग्रामीण असमानता आणि सामाजिक रचनेच्या निर्देशांकाबाबतची आव्हाने, अशा कडू-गोड परिस्थितीचा लेखाजोखा राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये मांडण्यात आला आहे.

जगभरात मंदीचे वारे वाहत असताना महाराष्ट्राच्या विकासदराचा ७.९ टक्क्यांचा अंदाज अर्थव्यवस्थेची भक्कम स्थितीच दर्शवतो. त्यामध्ये सेवा क्षेत्रात नऊ टक्के, उद्योग क्षेत्रात ५.७ टक्के आणि कृषी व संलग्न क्षेत्रांमध्ये ३.४ टक्के गतीने वाढीचा अंदाज आहे. या सर्व क्षेत्रांमधील समाधानकारक कामगिरी, हे चित्र नक्कीच सुखावणारे आहे. मात्र, दुसरीकडे याच अहवालातील राज्यावरील वाढता कर्जाचा बोजा आणि खर्चांचे प्राधान्यक्रम पाहता, सरकारी धोरणांमध्ये सुधारणांची अपेक्षा वावगी नाही.

गेल्या काही वर्षांमध्ये राज्याच्या विविध भागांमध्ये रस्ते, मेट्रो, बंदरे आणि विमानतळ अशा पायाभूत सुविधांमध्ये सरकारने मोठी गुंतवणूक केली; त्याचा लाभ भविष्यात निश्चितच होणार आहे. त्यामुळे राज्यात उभी राहिलेली उद्योगसंस्कृती अधिकच बहरण्याची आशा करावयास हरकत नाही. देश-विदेशांतील व्यासपीठांवर झालेले गुंतवणुकीचे करार पाहता वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये नवनव्या उद्योगांची स्थापना आणि त्यामार्फत रोजगारांमध्ये भर पडणेही अपेक्षितच आहे.

राज्यातील औद्योगिक कॉरिडॉर, व्यवसाय सुलभतेचे धोरण, डिजिटल प्रशासन आणि दळणवळणाच्या सुविधांमुळे सलग पाचव्या वर्षी महाराष्ट्रात वाढीची गती कायम राहण्याचा दिलासा अहवालाने दिला. याच बळावर महाराष्ट्र पूर्वीपासूनच देशात आघाडीवरचे राज्य असून, यंदाही देशाच्या 'जीडीपी'त राज्याचा वाटा सर्वाधिक, म्हणजे १४ टक्के असेल. त्या मार्गावर तमिळनाडू, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि गुजरातला महाराष्ट्राने मागे टाकले आहे. गेल्या वर्षी केंद्र सरकारने वस्तू व सेवा कराची फेररचना केल्याने साहजिकच राज्याच्या करवसुलीतही विक्रमी वाढ दिसून येते. सोबतच दरडोई उत्पन्नातही राज्याने तीन लाख ४७ हजारांचा टप्पा गाठला आहे; अर्थात तमिळनाडू, कर्नाटक, गुजरात आणि तेलंगण यांसारखी राज्ये याबाबत महाराष्ट्राच्या पुढे असल्याचा विचारही करावा लागेल.

एकीकडे राज्याच्या बलस्थानांची चर्चा करतानाच या अहवालातून भविष्यातील आव्हानेही अधोरेखित होतात. राज्यावरील कर्जाचा बोजा नऊ लाख कोटी रुपयांहून अधिक होण्याचा अंदाज आहे. त्याचे मोठे श्रेय 'लाडकी बहीण' सारख्या 'रेवडी' योजनांकडे जाते. अशा योजनांमुळे भांडवली विकासकामांवर मयार्दा येते, असा इशारा काही दिवसांपूर्वीच देशाच्या आर्थिक पाहणी अहवालानेही सर्वच राज्यांना दिला आहे. आता स्थानिक स्वराज्य संस्थांसह बहुतांश सर्व निवडणुका पार पडल्या आहेत, त्यामुळे लोकप्रिय योजनांना सरकारने आवर घालून आर्थिक शिस्तीकडेही लक्ष द्यावे, ही अपेक्षा चुकीची नाही. त्यातच नव्या वेतन आयोगाची चाहूल लागली असून, दुसरीकडे शेतकरी कर्जमाफीच्याही चर्चा सुरू आहेत. यांचा आर्थिक ताळमेळ बसवण्याकडेही लक्ष द्यावे लागेल.

पूर्वीच्या तुलनेत राज्याच्या शहरी भागांतील लोकसंख्या वेगाने वाढत असून, वर्ष-दोन वर्षांतच शहरीकरण ५० टक्क्यांच्या घरात जाईल, असे स्पष्ट दिसते. त्यामुळे भविष्यातील नागरी महाराष्ट्रापुढील आव्हाने पेलावी लागतील. बकालीकरण, झोपडपट्ट्या, वाहतुकीची कोंडी रोखणे; तसेच रस्ते-पाणीपुरवठा आणि कचरा व्यवस्थापनासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यावर आणि प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यावर अधिकाधिक भर द्यावा लागणार आहे. याच अहवालात महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर ९२१, म्हणजेच बिहार-उत्तर प्रदेशासारख्या कधी काळी मागास ठरलेल्या राज्यांपेक्षाही कमी असणे पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या राज्यास शोभा देणारे नाही. राज्याचे दरडोई उत्पन्न वाढत असले, तरी जिल्ह्यानुसार त्यातही असमानता दिसते. मुंबई, ठाणे व पुण्याच्या तुलनेत बीड, यवतमाळ आणि नंदुरबार यासारख्या जिल्ह्यांमध्येही प्रगतीची गंगा पोहोचविण्याकडे लक्ष द्यावे लागेल. या पार्श्वभूमीवर यंदाचा अर्थसंकल्प कोणती धोरणात्मक दिशा दाखवतो, हे महत्त्वाचे.

## कर्मचाऱ्यांची पीएफ वाढ हाच महागाईवरचा उतारा




निवृत्तीनंतर पेन्शनच्या माध्यमातून मिळणारा पीएफचा पैसा कर्मचाऱ्याच्या उतारवयातला मुख्य आधार ठरतो. म्हणूनच कर्मचाऱ्यांना आपल्या पीएफ खात्यातील रक्कम एटीएम, यूपीआयद्वारे सहजरित्या काढता यावी याकरिता ईपीएफओचे प्रयत्न सुरू आहेत. तर, दुसरीकडे निवृत्त कर्मचाऱ्यांना मिळणारी कमीत कमी 1 हजार रुपयांची रक्कम 9 हजार रुपयांपर्यंत वाढवून मिळावी या मागणीवरही केंद्र सरकारकडून विचार सुरू आहे. सध्याच्या काळात पेन्शनवाढ किंवा पीएफवाढ हाच कर्मचाऱ्यांसाठी वाढत्या महागाईवरचा उतारा ठरू शकेल.

ईपीएफओ लवकरच 'ईपीएफओ 3.0' ही आपली नवी डिजिटल सेवा सुरू करण्याच्या तयारीत आहे. या सेवेअंतर्गत ईपीएफ खातेधारकांना एटीएम आणि यूपीआयच्या माध्यमातून पीएफमधील पैसे काढण्याची सुविधा मिळेल. या नवीन सुविधेअंतर्गत, ईपीएफओकडून खातेधारकांना त्यांच्या पीएफ खात्याशी जोडलेले एक विशेष एटीएम कार्ड देण्यात येईल. या कार्डाचा वापर करून, खातेधारक पीएफमधील पैसे एटीएम मशीनमधून काढू शकतील. याचप्रकारे खातेधारक यूपीआय आयडी वापरूनदेखील ईपीएफ खात्यांमधून पैसे काढू शकतील. ही रक्कम थेट कर्मचाऱ्यांच्या लिंक्ड बँक खात्यांमध्ये हस्तांतरित केली जाईल. नवीन वैशिष्ट्यामुळे सदस्यांना त्यांचे ईपीएफ पासबुक शिल्लकदेखील पाहता येईल. ही सुविधा एप्रिलमध्ये सुरू होऊ शकते, असा अंदाज आहे. ही सुविधा सुरू होण्याआधी कोणतीही समस्या उद्भवू नये, यासाठी ईपीएफओकडून अंदाजे १०० डमी खात्यांचा वापर करून तांत्रिक चाचणी घेतली जात आहे. ही नवीन सुविधा यूएएन पोर्टल आणि उमंग ॲपशी जोडली जाईल. या नव्या सेवेचा फायदा ईपीएफच्या 8 कोटींहून अधिक खातेधारकांना मिळेल.

पीएफ काढण्याच्या नियमांनुसार, घर खरेदी/बांधकाम, दुरुस्ती, होम लोनचा परतावा, मेडिकल ट्रिटमेंट, लग्न आदी कारणांखाली खातेधारकाला 75 टक्क्यांपर्यंत रक्कम काढता येते. वेगवेगळ्या कारणांखाली पीएफची रक्कम काढण्यासाठी खातेधारकांना अटी-शर्थी पूर्ण कराव्या लागतात. तसेच एखाद्या कर्मचाऱ्याची नोकरी गेली तर तो एका महिन्यानंतर त्याच्या पीएफ शिल्लक रकमेपैकी ७५ टक्क्यांपर्यंत रक्कम काढू शकेल. जेणेकरून बेरोजगारीदरम्यान त्याला आपल्या गरजा पूर्ण करता येतील. एखादा सदस्य वर्षभरापासून जास्त काळ बेरोजगार असेल, तर त्या सदस्याला पीएफमधील संपूर्ण रक्कम काढता येईल. सध्या, ईपीएफओची ऑटो-सेटलमेंट सिस्टम तीन दिवसांत ५ लाखांपर्यंतचे दावे निकाली काढते. तर, दरवर्षी ५ कोटींहून अधिक पैसे काढण्याच्या दाव्यांवर प्रक्रिया करते. एटीएम किंवा यूपीआय आधारित सिस्टम लागू झाल्यानंतर ही प्रक्रिया आणखी जलद होऊन खातेधारकांना लक्षणीय दिलासा मिळेल.

'ईपीएफओ ३.०' हा ईपीएफओच्या डिजिटल परिवर्तनाचा एक भाग आहे. या उपक्रमात कोअर बँकिंग सिस्टम-आधारित पायाभूत सुविधांचा समावेश असेल. ज्यामुळे सर्व सेवा एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होतील. कागदपत्रे कमी करणे, पारदर्शकता वाढवणे आणि दाव्यांचा जलद निपटारा करणे हे यामागचे ध्येय आहे. सध्या, अनेक प्रकरणांमध्ये दाव्यांचा निपटारा करण्यासाठी १५ ते २० दिवस लागतात. नवीन प्रणालीमध्ये 3 दिवसांपेक्षा कमी वेळात दावे निकाली निघतील. यामुळे तक्रारी कमी होतील आणि खातेधारकांचा विश्वास वाढेल.

निष्क्रिय खात्यातील पैसे मिळतील. एपीएफओ आता निष्क्रिय ईपीएफ खात्यांमध्ये अडकलेले पैसे खातेधारकांना परत देण्यासाठीही योजना आखत आहे. मागील 36 महिन्यांपासून कर्मचारी किंवा कंपनीकडून ईपीएफ खात्यात अंशदान/ पैसे जमा न झाल्यास ते खाते निष्क्रिय मानले जाते. काही वेळा कर्मचारी नवीन नोकरीत गेल्यानंतर नवे ईपीएफ खाते बनवले जाते. मागच्या खात्यातली रक्कम ट्रान्सफर न करता तशीच पडून राहते. अशा असंख्य ईपीएफ खात्यांमध्ये छोटी छोटी रक्कम गेली कित्येक वर्षे तशीच पडून आहे. केंद्रीय श्रम मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, जवळपास 31.86 लाख निष्क्रिय ईपीएफ खात्यांमध्ये 10,903 कोटी रुपये तसेच पडून आहेत. यामध्ये 1 हजार रुपयांपर्यंत रक्कम शिल्लक असलेल्या 7 लाख खात्यांमध्ये 30.52 कोटी रुपये पडून आहेत. तर, उर्वरित रक्कम 25 लाख खात्यांमध्ये पडून आहे. सुरुवातीच्या टप्प्यात ईपीएफओने 1.33 लाख निष्क्रिय खातेधारकांच्या खात्यात पडून असलेली 5.68 कोटी रुपयांची रक्कम परत देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रक्रियेनुसार खातेधारकाच्या आधार लिंक्ड बँक खात्यात ही रक्कम थेट जमा होईल. ना कुठला फॉर्म भरण्याची गरज, ना कार्यालयांच्या चकरा मारण्याची आवश्यकता. सर्वकाही आपोआप होईल.

पेन्शनची रक्कम वाढवण्याची मागणी - कामगार संघटनांनी ईपीएस-95 अंतर्गत किमान पेन्शन 1,000 रुपयांवरून 9,000 रुपये प्रति महिना करण्याची मागणी पुन्हा एकदा उचलून धरली आहे. हा मुद्दा संसद आणि सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. यामुळे कर्मचारी पेन्शन योजना 1995 पुन्हा चर्चेत आली आहे. ईपीएस-95 किंवा कर्मचारी पेन्शन योजना 1995, ही एक सरकारी पेन्शन योजना आहे. जी संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या खासगी कर्मचाऱ्यांसाठी डिझाईन केलेली आहे. ईपीएफओद्वारे या पेन्शन योजनेचे व्यवस्थापन केले जाते. एखादा कर्मचारी ईपीएफमध्ये योगदान देतो तेव्हा नियोक्त्याच्या योगदानाच्या 8.33 टक्के रक्कम पेन्शन फंडात जमा होते. सरकार देखील 15000 रुपयांपर्यंतच्या पगारावर 1.16 टक्के रकमेचे योगदान देते. ईपीएस-95 अंतर्गत एखाद्या कर्मचाऱ्याने कमीत कमी 10 वर्षे काम करत ईपीएफमध्ये नियमित रक्कम जमा केली असेल, तर त्यांना 58 वर्षांच्या वयानंतर मासिक पेन्शन मिळते. मात्र, ही पेन्शन महागाईशी जोडलेली नाही. इथेच सगळे गणित विस्कटले आहे.

पेन्शनची रक्कम कर्मचाऱ्याचा पगार आणि एकूण सेवेच्या वर्षांच्या आधारावर ठरवली जाते. ही गणना सध्याच्या १५ हजार रुपयांच्या वेतन मर्यादेवर आधारित आहे. जर एखाद्या कर्मचाऱ्याने जास्तीत जास्त 35 वर्षे पेन्शन योग्य सेवा पूर्ण केली असेल, तर (15000 रु 35) / 70 या सूत्राचा वापर करून कमाल पेन्शन दरमहा अंदाजे 7500 रुपये इतकी होते. सोबतच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, ज्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रत्यक्ष पगारावर आधारित योगदान देण्याचा पर्याय निवडला आहे, त्यांना त्यांची पेन्शन 7500 पेक्षाही जास्त मिळू शकते. परंतु प्रत्येक कर्मचारी 35 वर्षे सेवा पूर्ण करतोच असे नाही, त्यामुळे या योजनेंतर्गत कमीत कमी 1 हजार रुपयांची रक्कम निश्चित करण्यात आली आहे. या किमान 1 हजार रुपयांच्या पेन्शनला कर्मचारी संघटनांचा आक्षेप असून ही रक्कम वाढवून किमान 9 हजार रुपये करण्याची मागणी ते करत आहेत.

सध्याच्या घडीला ईपीएफ-95 नियमांतर्गत 82,11,182 कर्मचाऱ्यांना दरमहा पेन्शन मिळते. यापैकी 47.09 लाख कर्मचारी असे आहेत ज्यांना 9 हजार रुपयांहून कमी पेन्शन मिळते. खरे तर 9 हजार रुपयांची दरमहा पेन्शन म्हणजे आजच्या महागाईच्या जमान्यात 'उंटाच्या तोंडात जिरे असे म्हणता येईल. केंद्र सरकारने १ सप्टेंबर २०१४ पासून जुनी ६,५०० रुपये पगाराची मयार्दा वाढवून १५,००० रुपये केली होती. पेन्शनची रक्कम थेट पगाराशी जोडलेली असल्याने पगाराची मर्यादा वाढली तर पेन्शनची रक्कमदेखील वाढेल, याची जाणीव कामगार संघटनांना आहे. म्हणूनच त्यांनी पेन्शनच्या पगाराची मर्यादा वाढवून 25 हजार रुपयांवर नेण्याची मागणीदेखील श्रम मंत्रालयाकडे केली आहे. या आकडेवारीनुसार एखाद्या कर्मचाऱ्याने किमान 10 वर्षे सेवा दिली असेल, तर त्याला किमान 3,570 दरमहा पेन्शन मिळू शकेल आणि 35 वर्षे सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्याला दरमहा 12,500 पेन्शन मिळू शकेल. शिवाय या प्रकरणी जानेवारीत सर्वोच्च न्यायालयातही दाद मागण्यात आली आहे. मागील पेन्शन मर्यादा वाढीला आता 12 वर्षे उलटल्याने केंद्र सरकारने 4 महिन्यात अभ्यास करून यावर निर्णय घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. केंद्रीय श्रम व कामगार राज्यमंत्री शोभा करंदजाले यांनी कामगार संघटनांकडून पेन्शन वाढीसंदर्भात असंख्य निवेदने आल्याचे संसदेतील लेखी उत्तरात मान्य केले. परंतु, यावर निर्णय कधीपर्यंत घेतला जाईल हे त्यांनी स्पष्ट केले नाही. सध्याची किमान 1 हजार रुपयांची पेन्शनवाढ 9 हजारांवर नेणे म्हणजे थेट नऊ पट वाढ होते. हा भार ईपीएफओ कसा पेलणार. पेन्शनसाठीची किमान वेतन मर्यादा वाढणार का? यावर केंद्राकडून उत्तर अपेक्षित आहे. किमान पेन्शनवाढीवर सकारात्मक निर्णय झाल्यास लाखो पेन्शनधारकांचे महागाईचे कोडे सुटून आर्थिक चणचणीचा किमान त्रास तरी कमी होईल हीच अपेक्षा.



## काँग्रेसचा शरणागतीचा इतिहास कसा विसरता!

राहुल गांधींनी मोदी सरकारवर आणि भाजप नेतृत्वावर टीका करण्यापूर्वी आपले वडील राजीव गांधी, आजी इंदिरा गांधी आणि पणजोबा पंडित नेहरू यांनी पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत अमेरिका, चीन आणि पाकिस्तानपुढे कितीदा लोटांगण घातले ते जाणून घ्यावे.

अमेरिकेबरोबर अलीकडेच झालेला व्यापार करार, चीन सैन्याशी गलवान खोऱ्यात झालेला संघर्ष, ऑपरेशन सिंदूर या मुद्द्यांच्या संदर्भात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्याकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षावर सातत्याने असभ्य भाषेत टीका करण्यात येते. राहुल गांधी हे लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. त्यामुळे त्यांना केंद्र सरकारच्या धोरणावर आक्षेप घेण्याचा, टीका करण्याचा अधिकार आहे. मात्र हा अधिकार वापरताना राहुल गांधी यांच्याकडून हेतूपूर्वक असत्य कथन केले जाते. या असत्य कथनामागे मोदी सरकारवर टीका करण्याऐवजी भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनाम करण्याचाच हेतू दिसतो आहे. राहुल गांधी यांच्या बुद्धिमत्तेचा आवाका लक्षात घेतला तर त्यांच्याकडून अभ्यासपूर्ण टीकेची अपेक्षा नाही. राहुल गांधींनी मोदी सरकारवर आणि भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वावर टीका करण्यापूर्वी आपले वडील राजीव गांधी, आजी इंदिरा गांधी आणि पणजोबा पंडित नेहरू यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत अमेरिका, चीन आणि पाकिस्तानपुढे कितीदा लोटांगण घातले आणि त्याचा भारताच्या नागरिकांना किती फटका बसला, याचा इतिहास जाणून घ्यावा.

पंडित नेहरू यांनी १९५४ मध्ये पंतप्रधान असताना तिबेटवरील भारताचा हक्क सोडून दिला आणि तिबेटवर कब्जा करण्यास चीनला अनुमती दिली. तिबेटवरील दावा सोडताना चीनच्या आक्रमक वृत्तीचा भारतावर काय परिणाम होईल, याचा विचार पंडित नेहरू यांनी केला नाही. चीनने अक्साई चीनचा मोठा भूभाग गिळंकृत केला तरी पंडित नेहरू यांनी त्याला आडकाठी केली नाही. चीनबरोबर पंचशील करार करून पंडित नेहरूंनी अक्साई चीन गिळण्याच्या कृतीला अधिकृत मान्यताच दिली. याच चीनने १९६२ मध्ये भारतावर अचानक आक्रमण केले. हे आक्रमण थोपवण्याएवढी संरक्षण सिद्धता नेहरू सरकारकडे नव्हती. चीनच्या आक्रमणाला प्रतिकार करताना हजारो सैनिकांना आपले प्राण गमवावे लागले. संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा समितीचे सभासदत्व चीनला मिळावे, यासाठी पंडित नेहरूंनी चीनची वकिली केली होती.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच चीनने भारतीय सीमेलगत असणारा भूभाग काबिज करण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या. जम्मू-काश्मीरचा भाग असलेल्या अक्साई चीनवर १९५० च्या दशकात चीनने पद्धतशीरपणे कब्जा केला. त्यावेळी पंडित नेहरू 'हिंदी-चिनी भाई-भाई'सारख्या भोळसट घोषणा देण्यात मग्न होते. १९६२ च्या युद्धापूर्वीच चीनने हा भाग बळकावला होता. चीनने हा भाग बळकावल्यानंतर त्याबाबतचा मुद्दा ५ डिसेंबर १९६१ रोजी संसदेत उपस्थित केला गेला. भारताचा एवढा मोठा आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा भूभाग बळकावला जात असताना नेहरू सरकार का गप्प होते, असा प्रश्न संसदेत उपस्थित केल्यावर पंडित नेहरू म्हणाले होते, 'ज्या जमिनीवर गवताचे पातेही उगवत नाही, त्या भागावर हक्क सांगण्यात काहीच फायदा नसून या भागासाठी युद्ध करणे चुकीचे आहे. तसेच या भागासाठी संसदेत चर्चा करणे म्हणजे वेळ वाया घालवणे आहे.' राहुल गांधींनी मोदी सरकारवर टीका करण्यापूर्वी आपल्या पणजोबांनी हजारो चौरस मीटर जमीन चीनच्या घशात कशी घातली, याचा अभ्यास करावा. १९४७-४८मध्ये पाकिस्तानने काश्मीरमध्ये टोळीवाल्याच्या रूपात आपले सैनिक घुसवले आणि मोठा भाग काबिज केला. हा भाग सध्या पाकव्याप्त काश्मीर म्हणून ओळखला जातो. त्यावेळी पंडित नेहरूंनी या भागातील पाकिस्तानला हुसकावण्यासाठी सैन्याला आदेश देण्याऐवजी पाकिस्तानविरुद्ध संयुक्त राष्ट्र संघात दाद मागण्याला प्राधान्य दिले. संयुक्त राष्ट्र संघाने पाकव्याप्त काश्मीरमध्ये 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचा आदेश दिला. त्यानंतर पंडित नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी पाकिस्तानच्या ताब्यातील हा प्रदेश परत मिळवण्यासाठी काहीच हालचाली केल्या नाहीत. १९७१ च्या युद्धात पाकिस्तानला अतिशय लाजीरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले होते. त्यावेळी भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्ध थांबावे यासाठी अमेरिका प्रयत्नशील होती. त्या युद्धात पाकिस्तानचे ९३ हजार सैनिक भारताच्या ताब्यात होते. पाकिस्तान लष्कर आणि राज्यकर्ते झुल्फीकार अली भुट्टो हे भारतीय लष्करापुढे युद्ध थांबवण्यासाठी गयावया करत होते. त्यावेळी पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानच्या अगतिक स्थितीचा फायदा घेऊन पाकव्याप्त काश्मीरचा ताबा घेण्याची सुवर्णसंधी दवडली. पाकिस्तानचे त्यावेळचे पंतप्रधान झुल्फीकार अली भुट्टो हे भारताशी वाटाघाटी करण्याकरिता सिमला येथे आले होते. ९३ हजार पाक सैनिक ताब्यात असतानाही इंदिरा गांधी यांनी पाकव्याप्त काश्मीर परत द्या, अशी मागणी झुल्फीकार अली भुट्टो यांच्याकडे केली नाही. त्या युद्धात शेकडो भारतीय सैनिक पाकिस्तानच्या ताब्यात होते. ते सैनिक परत मिळावेत, अशी मागणीही इंदिरा गांधी सरकारने केली नाही. १९७१ चे युद्ध भारतीय सैन्याने प्रचंड पराक्रम करून जिंकूनही इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानबरोबर युद्ध थांबवण्याचा करार केला. हा करार सिमला करार म्हणून ओळखला जातो. आपल्या आजीने पाकिस्तानपुढे अशी शरणागती का पत्करली, यामागची कारणे शोधण्यासाठी राहुल गांधी यांनी खरे तर प्रबंध लिहावा.

बोफोर्स या स्वीडिश तोफा खरेदी करताना झालेल्या व्यवहारात मध्यस्थांना मोठी रक्कम मिळाली होती. यातील मुख्य मध्यस्थ असलेला क्वात्रोची हा इटलीचा नागरिक होता. या क्वात्रोचीला पकडण्याची संधी मनमोहन सिंग सरकारच्या काळात कोणाच्या दबावामुळे गमावली हे राहुल गांधी आपल्या मातोश्रींना म्हणजेच सोनिया गांधी यांना विचारण्यास हरकत नाही. १९८४ मध्ये भोपाळ वायू दुर्घटनेत हजारो लोकांना आपला जीव गमवावा लागला. ही वायुगळती ज्या कंपनीतून झाली त्या कंपनीचा संचालक असलेल्या वॉरेन अँडरसन याला सुखरूपपणे अमेरिकेत पाठवताना त्यावेळचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी अमेरिकेपुढे का लोटांगण घातले, याचा इतिहासही युवराज राहुल गांधी समजावून घ्यावा. काँग्रेस आणि गांधी-नेहरू घराण्याचा इतिहास अमेरिका, चीन आणि पाकिस्तानपुढे लोटांगण घालण्याचाच आहे. काँग्रेसच्या या लोटांगणाची भारताला फार मोठी किंमत मोजावी लागली आहे. २०२० मध्ये आणि २०१८ मध्ये चीनच्या घुसखोरीला वेळीच रोखण्याचे काम मोदी सरकारने केले. पाकिस्तानच्या दहशतवाद्यांना मदत करण्याच्या कृत्याबद्दल मोदी सरकारने पाकिस्तानला सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक करून खणखणीत उत्तर दिले होते. युवराजांना हा स्वाभिमानाचा इतिहास कळत नाही. हा इतिहास आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर अभिमानाने सांगण्याऐवजी राहुल गांधी आपल्या देशाची बदनामी कशी होईल, यासाठी प्रयत्न करताना दिसतात.

# सुंदर लिप्ससाठी टिप्स!

**आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.**



**तुम्हाला** तुमचे आकर्षण कायम ठेवायचे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या ओठांकडे लक्ष्य देण्याची गरज आहे. आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.

▮रोज ५ ते ६ ग्लास पाणी प्यायला पाहिजे. पाण्यामुळे फक्त शरीराला लागणारी पाण्याचीच पूर्ती पूर्ण होत नाही तर ओठांची नमी कायम राहते.

▮बऱ्याच लोकांना ओठांना चावायची सवय असते ती बदलायला पाहिजे. दीर्घ काळापर्यंत लिपस्टिकची चमक कायम ठेवण्यासाठी लिपस्टिक लावल्यानंतर टिशू पेपरने एक्स्ट्रा लिपस्टिक काढून घ्यावी. यामुळे लिपस्टिकची चमक पूर्ण दिवसभर कायम राहते.

▮डार्क कलरचे लिपस्टिक लिप्सला स्मॉल लूक देतात. जर तुमच्या ओठांचा आकार लहान असेल आणि त्याला मोठा लूक द्यायचा असेल तर नॅचरल कलरचे लिपस्टिक वापरायला पाहिजे.

▮जर ओठ जाड असतील तर कन्शिलर आणि फाऊंडेशनच्या मदतीने लिप्सला पातळ शेप देऊ शकता. लिप लायनरने आऊट लाइन ड्रॉ करावी आणि डार्क कलरचे लिपस्टिक त्यात भरायला पाहिजे.

▮जर लिप्सला हॉट लूक द्यायचा असेल तर स्ट्राबेरी आणि चेरी शेड्सचा लिपस्टिकसुद्धा लावू शकता.

▮ बदलत्या मोसमाचा सर्वात जास्त प्रभाव ओठांवर पडतो. म्हणून नेहमी चांगल्या कंपनीचे लिप बाम दिवसातून दोन-तीन वेळा लावायला पाहिजे.

# बेबी मसाजचे फायदे माहीत आहेत का?

**मुलांच्या** सर्वांगीण विकासासाठी त्यांचा आहार, देखरेख व पोषक वातावरण आदी महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते. मात्र याव्यतिरिक्त बाळ तंदुरुस्त राहावे म्हणून बेबी मसाज लाभदायी असतो. मसाजमुळे मुलांची हाडे तंदुरुस्त होतात. शिवाय मुलाच्या बुद्धीलाही चालना मिळत असते. लहान मुलाच्या मसाजचा भारतीय आयुर्वेदातही उल्लेख आढळतो.

**मसाजचे फायदे-**

▮ मसाजमुळे मुलाचे वजन वाढण्यास मदत होते.



▮दिवसभरातून किमान एक वेळा मसाज केल्याने मुलाचे स्नायू बळकट होतात.

▮मसाजमुळे मुलामधील एकाग्रता वाढते.

▮ मुलाच्या पोट व पचनक्रियेसंबंधी व्याधी दूर होतात.

▮मसाजमुळे मुले व आई यांच्यात घनिष्टता वाढीस लागते.

▮मसाजमुळे मुलांना शांत झोप लागत असते.

▮मसाजमुळे मुलाचा शारीरिक व मानसिक विकास होत असतो.

# उन्हाळ्यात सोडा, पॅक्ड ज्यूस वगळून केवळ प्या पाणी

**वजन कमी होतं**

हल्लीच्या लाइफस्टाइलमध्ये सगळे वाढत असलेल्या वजनामुळे परेशान असतात. अशात वजन कमी करण्यासाठी शुगर असलेले पेय पदार्थ न पिता केवळ पाणी पिणे योग्य ठरेल. याने अधिक प्रमाणात कॅलरी बर्न होण्यात मदत मिळेल.

**चयापचय क्षमता वाढेल**

केवळ पाणी पिण्याने आपली चयापचय क्षमता वाढेल आणि यामुळे ऊर्जेचे स्तरदेखील. म्हणून दिवसभर खूप पाणी प्या. या व्यतिरिक्त अधिकाधिक पाणी पिण्याने आपल्याला ध्यान केंद्रित करण्यात देखील मदत मिळेल.

**खाण्यावर नियंत्रण**

आपली डाएट घेल्यानंतरही आपल्याला भूक जाणवत असेल तर केवळ एक ग्लास पाणी प्यावे. याने वजन नियंत्रित करण्यात मदत मिळेल. अनावश्यक कॅलरीज कमी करण्यासाठी पाणी पीत राहावे.

**विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढते**

अधिक पाणी पिण्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहते आणि वय वाढले तरी तारुण्य टिकून राहते. या व्यतिरिक्त अनेक आजार हाय ब्लड प्रेशर, हृदयासंबंधी आजार आणि अपचन सारखे आजार होण्याचा धोका टळतो.



# पेरूचे आरोग्यदायी सरबत

**साहित्य :** एक पिकलेला पेरू, दोन चमचे साखर (चवीनुसार), अर्धा इंच अद्रकाचा (आलं) तुकडा, चवीनुसार मीठ, अर्धा चमचा लिंबाचा रस, एक ते दीड कप पाणी थंड पाणी

**कृती :** पिकलेला पेरू धुवून त्याची साल काढावी. पेरूच्या फोडी करून घ्याव्यात. यानंतर या फोडी मिक्सरच्या भांड्यात टाकाव्यात. सोबत अद्रक, मीठ, लिंबाचा रस व एक कप थंड पाणी टाकून मिक्सर फिरवावे. हे सर्व मिश्रण गाळून घ्यावे... तुमच्यासाठी ताजे थंडगार सरबत तयार..

# खानपानच्या ५ असंगत जोड्या सेवन करताना काळजी घ्या

**खाण्या-पिण्याच्या भिन्न वस्तू आरोग्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे फायदा करतात. काही पदार्थ मिसळून खाल्ल्याने फायदा होतो तर काही पदार्थ असे आहेत जे सोबत खाल्ल्याने आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. तर जाणून घ्या अशा ५ जोड्यांबद्दल, ज्याचे सेवन टाळावे.**

**आंबा आणि काकडी**

उन्हाळ्यात आंबा आणि काकडी दोन्हीचे खूप सेवन केलं जातं, परंतु जेवताना दोन्ही सोबत खाणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरतं. आंबा एक फळ आहे तर काकडी भाजी म्हणून दोघांना पचनासाठी वेगवेगळ्या एनजाइम्सची गरज भासते, अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन संबंधी समस्या होऊ शकतात.

**डेअरी प्रॉडक्ट्स आणि पालक**

पालकासह डेअरी प्रॉडक्ट्समध्ये पनीर मिसळून तयार भाजी लोकं चव घेऊन खातात. परंतु डेअरी प्रॉडक्ट्समध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात आढळतं आणि पालकात आढळणारे ऑक्सॅलिक ॲसिड शरीराला कॅल्शियम अवशोषित करण्यापासून थांबवतो. ज्यामुळे हे पदार्थ सोबत खाल्ल्याने फायदा होत नाही.

**दूध आणि डाळी**

अनेक पोषण विशेषज्ञाचे म्हणणे आहे की, दुधाचे पचन पोटाऐवजी छोट्या इन्टेस्टाइनमध्ये होतं आणि डाळीने तयार कोणते हा पदार्थ शरीर वेगळ्याने पचवतो. अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन क्रियेची गती कमी होते.

**भोजनासह फिजी ड्रिंक्स**

फिजी व कार्बोनेटेड ड्रिंक्समध्ये अती प्रमाणात साखर असते. हे भोजनासह घेतल्याने पचन प्रणाली वाईट रित्या प्रभावित होते. याने पचन क्रियेची गती कमी होते आणि सोबतच गॅस व ब्लॉटिंगसारख्या समस्या उद्‌भवू लागतात.

**दूध आणि ॲंटीबायोटिक्स**

ॲंटीबायोटिक औषध दुधासोबत घेतल्याने औषधांचा प्रभाव पडत नाही असे मानले जाते.

# रोज एक फळ खाण्याची सवय लावा

**बऱ्याच काळापासून असे म्हटले जाते की ताजी फळे खाण्याचे फायदे खूप आहेत. यामुळेच सर्वांनी ही वस्तुस्थिती स्वीकारून आपल्या आहारात फळांचा समावेश केला आहे. फळाची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यात अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, खनिजे आणि आहारातील फायबरसारखे पोषक घटक आढळतात. यामुळे आपले शरीर मजबूत होते. फळे शरीराला चांगल्या प्रकारे कार्य करण्यास मदत करण्यासाठी विविध प्रकारचे पोषक प्रदान करतात. फळांमुळेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढते आणि आपल्या पेशींना दुरुस्तीची संधी मिळते. जरी असे खूप कमी लोक असतील ज्यांनी दररोज एक फळ खाण्याचा विचार केला असेल. चला जाणून घेऊया रोज एक फळ खाणे आरोग्यासाठी का महत्त्वाचे आहे?**


▸ **रक्तातील साखरेचे नियंत्रण :** सर्व फळांमध्ये नैसर्गिकरित्या साखर असते. त्यात फायबर आणि पोषक घटक देखील असतात. त्यांच्यामुळे रक्तप्रवाहात साखर शोषून घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढत नाही.

▸ **मानसिक आरोग्य :** फळांमध्ये नैसर्गिकरीत्या काही पोषक घटक असतात, ज्यामुळे आपले मानसिक आरोग्य चांगले राहते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जामुन, जे मानसिक आरोग्य सुधारणारे फळ म्हणून ओळखले जाते.


▸ **वजन नियंत्रणात ठेवा :** फळांची एक चांगली गोष्ट म्हणजे त्यामध्ये कॅलरीज कमी असतात. त्यात फॅटचे प्रमाणही कमी आढळते, तर फायबर आणि पाण्याचे प्रमाण अधिक असते. यामुळेच आहारात फळांचा समावेश केल्यास वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

▸ **ॲंटिऑक्सिडंट्स :** फळांमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे, तुमच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह तणावामुळे होणारे नुकसान टाळण्याची संधी मिळते. ॲंटिऑक्सिडंट्स हृदयविकाराचा झटका, कर्करोग आणि न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांचा धोका देखील कमी करतात.

▸ **पचन सुधारते :** फळे नैसर्गिक एन्झाईम्सने भरलेली असतात. यामुळे तुमची पचनक्रिया चांगली होते. उदाहरणार्थ, अननसातील ब्रोमेलेन आणि पपईतील पपेन हे पचनासाठी चांगले असतात. हे एन्झाइम प्रथिने तोडण्यास मदत करतात.



# उन्हाळ्यात जीन्स वापरताय, अशी घ्या काळजी...



**उन्हाळ्यात सगळ्यात सोयीस्कर म्हणून तुम्ही जीन्स घालत असाल, तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे. उन्हाळ्यात बाहेर निघालं की शरीराची अक्षरशः लाही-लाही होण्यास सुरुवात झाली आहे. अशात जर तुम्ही घट्ट जीन्स वापरत असाल, तर जीन्स वापरताना नक्की काळजी घ्या. उन्हाळ्यात घराबाहेर पडताना जीन्स-टॉप किंवा टी शर्ट आणि गॉगल लावला असा रफटफ पेहराव तुम्ही करत असाल. तर तुमच्यासाठी थोडं महत्त्वाचं...**

**जीन्स** अतिशय घट्ट असेल तर जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. घट्ट जीन्स वापरल्यामुळे त्वचेची जळजळ, त्वचा काळवंडणं, घामोळ्या येणं, खाज सुटणं, काळे चट्टे येणं असे त्रास होऊ शकतात. गेल्या काही दिवसांत घट्ट जीन्समुळे जंतुसंसर्ग झाल्याचं प्रमाण वाढलंय. विशेष म्हणजे खाज कमी करण्यासाठी स्टेरॉईडयुक्त मलम लावलं जातं. त्यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता असते. उन्हाळा असल्यास पातळ, सुती कपडे घालणे योग्य आहे. त्यामुळे शरीरीतील घाम शोषूण घेण्यास मदत होते. जाड कपड्यांचा पेहराव शक्यतो करू नये. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही क्रीम वापरू नये, असा सल्ला डॉ. उदय कोपकर, त्वचारोगतज्ज्ञ यांनी दिला आहे.



उन्हाळ्यात प्रामुख्याने अतिनील किरणांमुळे डोळ्यांना त्रास होतो. गॉगल बी २ इतका काळा असणं गरजेचं आहे. यूव्ही-रेजपासून संरक्षण करणाऱ्या कॉण्टॅक्ट लेन्ससुद्धा उपलब्ध आहेत. यंदाच्या उन्हाळ्यात तुमच्या शरीराची काळजी नक्की घ्या.

# ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता

**शारीरिक विकास आणि तंदुरुस्त राहणे यासाठी जीवनसत्त्वे, खनिजे यांची आवश्यकता असते. या घटकांची कमतरता असल्यास शरीराला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वही शरीरासाठी महत्त्वाचे असते. रोगांपासून बचाव करण्यासाठी ई जीवनसत्त्व गरजेचे असते. त्याची कमतरता भासल्यास केस, डोळे, त्वचा यांच्याशी निगडित अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वाची कमतरता भासल्यास शरीराकडून काही संकेत मिळतात. शरीराच्या या संकेतांकडे वेळीच लक्ष न दिल्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेची कारणे, त्याची लक्षणे आणि कमतरता भरून काढण्यासाठी काय उपाय करावेत ते पाहूया.**

**कमी** चरबीयुक्त आहार घेतल्यास शरीराला ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता भासते. ज्या लोकांना आतड्यांशी निगडित आजार आहेत. उदा, क्रोहन आणि पित्त (गॉलब्लाडर) या समस्या भेडसावत असतील त्यांच्यामध्ये ई जीवनसत्त्वाची कमतरता असते.

**लक्षणे :**

**स्नायू कमजोर होतात :** ई जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास स्नायू कमजोर होतात. ई जीवनसत्त्व आणि सेलेनियमची कमतरता असल्यास मायोपॅथीची समस्या वाढते. मायोपॅथीमध्ये स्नायू सुकायला लागतात ते पसरू लागतात किंवा स्नायूंमध्ये वाकडेपणा येतो. ज्यामुळे शरीराचे अवयव वाकडे होऊ लागतात. चालण्या-फिरण्यात अडचणी निर्माण होतात. लहान मुले आणि ज्येष्ठ व्यक्ती यांना हा आजार होण्याचा धोका अधिक आहे. त्याव्यतिरिक्तही अनेक समस्या निर्माण होतात.



**दृष्टी कमी होणे :** ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे डोळ्यांचा रेटिना आणि डिजनरेशन पातळ होते. त्यामुळे डोळ्यातील आतल्या भागावर त्याचा परिणाम होतो. अनेकदा दृष्टी धुसर होते आणि रात्री काही न दिसण्याची समस्या म्हणजे रातआंधळेपणा येऊ शकतो.



**रक्ताची कमतरता :** अनेकदा शरीरात रक्ताची कमतरता होऊ लागते. हल्ली रक्तपेशी कमी होणे यात नवल राहिलेले नाही. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळेही असे होऊ शकते. त्यामुळे शरीराला योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही आणि व्यक्ती अशक्त होऊ लागते.

**ई जीवनसत्त्वाची कमतरता कशी पूर्ण कराल?**

शाकाहारी लोकांना ई जीवनसत्त्वाची कमतरता पूर्ण करण्यासाठी भाज्या, हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, रताळे, सलगम, मोहरी, आंबा, ब्रोकोली, गहू, बीन्स, अव्हाकॅडो इत्यादींचा समावेश आपल्या आहारात करावा.

# ॲसिडिटीवर करा घरगुती उपचार

**अनेक** जणांना ॲसिडिटीचा मोठा त्रास होतो. डोकं दुखणं, मानदुखी, छातीत जळजळ होणे, उलट्या होणे, अर्धशिशी, अस्वस्थ होणे अशा प्रकारचा त्रास होतो. झोप पूर्ण न होणं, जागरण, उपाशी राहाणं, चुकीची जीवनशैली, अवेळी खाणे, झोपेच्या सतत बदलत्या वेळा यामुळे त्रास होत असतो. ॲसिडिटीचा त्रास कमी करण्यासाठी अनेक जण गोळ्या घेतात. परंतु अशा गोळ्यांमुळे काही वेळ बरं वाटतं, परंतु पुन्हा त्याचा त्रास सुरू होतो. सतत गोळ्या घेतल्याने त्याचा शरीरावरही घातक परिणाम होत असतो. परंतु ॲसिडिटीवर घरगुती उपयांनीही काही वेळात आराम मिळू शकतो.

▮सतत ॲसिडिटीचा त्रास होत असणाऱ्यांनी थंड दूध प्यायल्याने पोटात आणि छातीत होणारी जळजळ कमी होते.

▮आल्याचा तुकडा चावून खाल्ल्यानंतर त्यावर गरम पाणी प्यायल्याने फायदा होतो.

▮केळे ॲसिडिटीवर अतिशय नैसर्गिक उपाय आहे. ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास नियमित केळे खाल्ल्याने फायदा होतो.

▮ बडिशेप ॲसिडिटी कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. जेवणानंतर बडिशेप खाल्ल्याने ॲसिडिटीचा त्रास होत नाही. बडिशेप चावून किंवा चहा करूनही पिऊ शकतात.

▮आवळा सी विटॅमिनयुक्त असतो. आवळा पोटदुखी, गॅस, ॲसिडिटीमध्ये आराम देतो. आवळा पित्त कमी करत असून केसांचं आणि त्वचेचंही आरोग्य राखतो.


▮टोमॅटोमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि विटॅमिन सी असतं. जे शरीरातील जीवाणूंना बाहेर काढतं. टोमॅटो आंबट असलं तरी शरीरात क्षारांचे प्रमाण वाढवतं. टोमॅटोच्या नियमित सेवनाने ॲसिडिटीची समस्या कमी होते.

▮मसाल्यांमधील ओवा अतिशय गुणकारी आहे. ॲसिडिटीवरही ओवा फायदेशीर आहे. ॲसिडिटीचा झाल्यास ओवा आणि जिरं एकत्र भाजून घ्या. हे मिश्रण पाण्यात टाकून थोडी साखर टाकून प्यायल्याने फायदा होतो.

▮गुळात मॅग्नेशियम असतं. मॅग्नेशियम आतड्यांना मजबूत करण्याचं काम करतं. त्यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. रोज जेवणानंतर गुळ खाल्ल्याने पित्त, ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

▮वेलची खाल्ल्याने ॲसिडिटीची समस्या दूर होते. एक ग्लास पाण्यात २ वेलची उकळून पाणी थंड करून प्या. त्यामुळे ॲसिडिटीचा त्रास दूर होतो.

▮तुळशीची पानंही पित्ताच्या, ॲसिडिटीच्या त्रासावर गुणकारी आहेत. पित्ताचा, ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास तुळशीची काही पानं चावून खा किंवा पानं पाण्यात उकळवून ते पाणी पिण्यानेही फायदा होतो. नियमित तुळशीची पानं खाल्याने पित्ताचा त्रास कायमचा बरा होतो.



# केळी खाण्याचे असेही फायदे

**फळांमधील केळे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी ठरते. केळयात पोटॅशियम आणि विटॅमिन भरपूर प्रमाणात असतात. त्याशिवाय केळयात इतरही अनेक पोषक तत्त्व असतात, जी शरीरासाठी अतिशय गुणकारी असतात. त्यामुळेच कोणत्याही प्रकारचं केळे आपल्या खाण्यात सामील केल्याने फायदे होतात. दररोज केळे खाल्ल्याने हार्ट ॲटॅकची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होते. त्याशिवाय केळयाचे इतरही अनेक फायदे आहेत. आज वर्ल्ड बनाना डे आहे. या विशेष दिवशी जाणून घ्या अति पिकलेल्या केळयाचे जबरदस्त फायदे.**



**केळ्याचा** रंग जसजसा काळा पडत जातो, ते अधिक, अति पिकलं जातं असं केळं अनेक जण खराब झालं म्हणून किंवा काळं आणि अतिशय मऊ झालं म्हणून खायला आवडतं नसल्याचं सांगतात. परंतु अति पिकलेलं, मऊ, काळं झालेलं केळं शरीरासाठी अतिशय गुणकारी असतं. या केळ्याच्या दररोज खाण्याने अनेक आजारांपासून दूर राहण्यास मदत होते.

रंगाच्या आधारे केळं पिकलेलं आहे किंवा कच्चं आहे याचा अंदाज लावता येतो. केळ्याचा रंग जर हिरवा असेल तर ते कच्चं केळं म्हणून ओळखलं जातं. अशा केळ्याचा वापर भाजीसाठी केला जातो. त्यानंतर केळ्याचा रंग पिवळा होत जातो. केळं अधिक पिकत गेलं की त्यावर काळे डाग पडायला सुरुवात होते. त्यानंतरही काही दिवसांत केळ्याचं संपूर्ण सालचं काळं पडत. युनायटेड नेशनमधील ‘इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट’ या संस्थेने अति पिकून संपूर्ण साल काळं पडलेल्या केळ्याचे महत्त्व, त्याचे फायदे सांगितले आहेत. अशा केळ्यात ट्रिप्टोफॅन मोठ्या प्रमाणात असतं. त्यामुळे मानसिक ताण, चिंता (Anxiety) कमी होण्यास मदत होते. तसेच या मोठ्या प्रमाणात पोषकद्रव्ये असतात. त्यामुळे अशा केळ्याचा वापर ब्रेड बनवण्यासाठी तसेच मिल्कशेक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो.

हिरवी साल असलेलं केळं खात असाल तर त्यामुळे रक्तातील साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. हे केळं अगदी हळूहळू पचतं. त्यामुळे ब्लड ग्लुकोज कमी प्रमाणात निर्माण होतं. पिकलेलं केळं ॲण्टी-ऑक्सिडेंट म्हणून मानलं जातं. हे केळं मेटबॉलिज्म अर्थात चयापचन क्रियेला मजबूत करण्यात मदत करते. त्यामुळे अनेक आजार होण्याची शक्यता अतिशय कमी होते. हे केळं अगदी सहजतेने पचतं. त्यामुळे अति पिकलेल्या केळ्याचा वापर नाश्त्यामध्ये करणे अतिशय आरोग्यदायी मानले जाते. डॉक्टरांकडूनही सकाळच्या नाश्त्यात केळं खाणं गुणकारी मानले जाते.

केळे बाराही महिने बाजारात मिळणारे फळ आहे. केळ्याचा वापर सौंदर्यासाठीही केला जातो. केळं शक्तिवर्धक आहे. दररोज केळी खाणाऱ्या व्यक्तीला एनिमियाचा धोका नसतो. केळं खाल्याने मूडही चांगला राहतो. थकवा दूर होतो. केळ्यातील प्रोबायोटिक बॅक्टेरिया खाण्यातील कॅल्शियम शोषून घेते. यामुळे हाडेही मजबूत होतात.

# एसटीत मद्यपानास ‘शून्य सहनशीलता’... चालक-वाहकांची अल्कोटेस्ट तपासणी सक्तीची

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सेवेत असताना मद्यपानास आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे दररोज मद्यपान तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून, योग्य नोंदी घेऊनच चालकांना कर्तव्यावर पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

२५ जानेवारी २०२६ रोजी सरनाईक यांनी परळ बसस्थानकाला भेट दिली असता तेथे काही धक्कादायक प्रकार आढळून आला. या प्रकाराची गंभीर दखल घेत मंत्री सरनाईक यांनी तातडीने चौकशी समिती नेमून या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगितले होते. त्याअनुषंगाने एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजनाही सुचविण्यात आल्या आहेत.

हा चौकशी अहवाल एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना सादर करण्यात आला असून त्यांच्या निदेर्शानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. तसेच समितीने सुचविलेल्या उपाययोजना तातडीने सर्व आगारांमध्ये लागू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. नव्या उपाययोजनांनुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या चालकांची वाहन परीक्षकांच्या माध्यमातून नियमित तपासणी केली जाणार आहे. वाहकांचीही ड्युटी देण्यापूर्वी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे. तपासणी झाली आहे की नाही, यावर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**जनजागृतीसाठी प्रशिक्षण सत्र**

एसटी कर्मचाऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येणार असून सामाजिक संस्थांच्या सहकार्याने मद्यपानाचे दुष्परिणाम याबाबत प्रबोधन केले जाणार आहे. आगारांमध्ये ह्यमद्यपान जनजागृती सप्ताहह्ण आयोजित करून चालक-वाहक व इतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मुख्य बसस्थानक, चालक-वाहक विश्रांतीगृहे, ज्या आगारांमध्ये चालक-वाहक जास्त प्रमाणात थांबतात अशा ठिकाणी मद्यपानास प्रतिबंध करण्यासाठी लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, लाइट-पंखे आदी सुविधांची देखभाल करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर आहे.



# जिल्हा परिषद शाळांमध्ये तिसऱ्या डोळ्याची नजर

## पहिल्या टप्प्यात ठाण्यात ५२४ शाळांमध्ये सीसी टीव्हीचे काम पूर्ण

■ **ठाणे। प्रतिनिधी,**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आता तिर्सया डोळ्याची करडी नजर असणार आहे. पहिल्या टप्प्यात ५२४ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत शाळांमध्ये एप्रिल २०२६ अखेर पर्यंत सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली शीघ्रतेने ही योजना पूर्ण करण्यात येत आहे. ठाणे जिल्हा नियोजन समितीमार्फत उपलब्ध तरतुदीतून पहिल्या टप्प्यात कल्याण तालुक्यात१२०, भिवंडी ३०८ सीसीटीव्ही बसविण्याचे काम १०० टक्के पूर्ण झाले असून अंबरनाथ तालुक्यात ९६ सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. तर १८ शाळेतील कामकाज प्रगतीपथावर आहे. असे एकूण ५२४ शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. मुरबाड गटातील ३२९ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम सुरू असून या शाळांमधील सर्व यंत्रणा मार्च २०२६ अखेरपर्यंत कार्यान्वित होणार आहेत. शहापूर गटातील ४५७ शाळांमध्ये एप्रिल २०२६ अखेरपर्यंत सीसी टीव्ही कार्यन्वित होणार आहेत.

# एसटीच्या ‘शिवनेरी’ धावणार राज्यभरात... २०० अत्याधुनिक व्होल्वो बसेसची खरेदी

■ **पुणे। प्रतिनिधी,**

पुणे ते मुंबईदरम्यान धावत असलेली एसटीची अत्याधुनिक, आरामदायी आणि सुरक्षित ‘शिवनेरी’ बस आता राज्यभर धावणार आहे. राज्यभर विस्तारासाठी २०० नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त व्होल्वो बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होताच, मुंबईझ्रपुणेप्रमाणेच इतर महत्त्वाच्या शहरांदरम्यानही शिवनेरी सेवा सुरू होणार आहे.



एसटी महामंडळाने २००२ मध्ये शिवनेरी बस सेवा सुरू केली. या सेवेने उच्च मध्यमवर्गीय प्रवाशांचा विश्वास जिंकला. इतर बससेवेपेक्षा तिकीटदर थोडे अधिक असतानाही सातत्याने मिळणाऱ्या उत्तम प्रतिसादामुळे ही सेवा सुरुवातीपासूनच नफ्यात आहे. त्यामुळे या बसेसचा राज्यभर विस्तार करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. नाशिक-पुणे, नाशिक-छत्रपती संभाजीनगर, नाशिक-जळगाव-धुळे, पुणे-कोल्हापूर, पुणे-सांगली, पुणे-सोलापूर, नागपूर-चंद्रपूर, नागपूर-अमरावती-अकोला अशा प्रमुख शहरांचा समावेश आहे. त्यामुळे राज्याच्या विविध भागांतील प्रवाशांना आलिशान, सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. नवीन २०० बसेसमध्ये ३० शयनयान बसेसचा समावेश असेल.

सध्या ज्या मार्गांवर विनावातानुकूलित शयनयान बससेवा आहे, त्या ठिकाणी ‘स्लिपर शिवनेरी’ सुरू करून प्रवासी सेवेला अधिक उन्नत रूप दिले जाणार आहे. आरामदायी बेड-कोच सुविधा, सुरक्षितता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे दीर्घ पल्ल्याच्या प्रवासात प्रवाशांना नव्या अनुभवाची हमी मिळणार आहे.महिला प्रवाशांना तसेच ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना तिकीटदरात ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना शिवनेरी प्रवास पूर्णपणे विनामूल्य आहे. त्यामुळे नव्या मार्गांवरही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल, असा विश्वास महामंडळाला आहे. त्याचप्रमाणे सध्या दादर-स्वारगेट, दादर-शिवाजीनगर, बोरिवली-स्वारगेट, बोरीवली-शिवाजीनगर, ठाणे-स्वारगेट आणि ठाणे-शिवाजीनगर या मार्गांवर पर्यावरणपूरक ई-शिवनेरी बस सेवा सुरू असून प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# नुरी बाबा दर्ग्यातील 10 वृक्षांवर बेकायदा कुऱ्हाड... महापालिकेने बजावली नोटीस

**ट्रस्टला महापालिकेची नोटीस**

नुरी बाबा दरगाहमधील 10 वृक्ष परवानगीशिवाय बुंध्यापासुन तोडण्यात आले आहेत. यानंतर ठाणे महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाचे उद्यान निरीक्षक कृष्णनाथ धावडे यांनी तातडीने नुरीबाबा दर्ग्याच्या व्यवस्थापकांवर नोटीस बजावून खुलासा मागवला आहे. या कृत्याला, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 चे कलम 21' (1) व (2) तरतूदीचे उल्लंघन झालेले असून अधिनियमानुसार नुरी बाबा दरगाह ट्रस्टचे व्यवस्थापक व्यक्तीशः जबाबदार असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे ते दंड अथवा तुरुंगवासाच्या कारवाईस पात्र ठरत असल्याचे उद्यान निरीक्षक धावडे यांनी नोटीसमध्ये नमूद केले आहे.

■ **ठाणे। प्रतिनिधी,**

ठाण्यातील चंदनवाडी परिसरातील हजरत नुरी बाबा दरगाह ट्रस्टच्या आवारातील प्राचीन 10 भलेमोठ्या वृक्षांवर शनिवारी (28 फेब्रुवारी) कुऱ्हाड चालवण्यात आली. ही वृक्षतोड बेकायदा असल्याचे निदर्शनास येताच स्थानिकांनी वृक्ष कत्तलीला विरोध दर्शवला. त्यानंतर याप्रकरणी स्थानिक शिवसेना नगरसेवक राजेश मोरे तसेच शिवसेना-भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवारी (4 मार्च) सायंकाळी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या घटनेनंतर ठाणे महापालिकेसह पोलीस प्रशासनाने या वृक्षतोडीची चौकशी करून तातडीने कारवाई करण्याची आग्रही मागणी केली आहे.



ठाणे पश्चिमेकडील मखमली तलावाच्या शेजारी असलेला नुरी बाबा दरगाह हा मुस्लीम धर्मीयांसोबतच हिंदू आणि इतर धर्मियांचे देखील श्रद्धास्थान आहे. नुरी बाबा यांच्या नावाने प्रसिद्ध असलेल्या या दर्ग्यामध्ये नुरी बाबा यांची समाधी आहे. या दर्ग्या शेजारील मोकळ्या जागेतील चार अशोका वृक्ष, दोन सुपारीची झाडे, एक कोकम, दोन नारळाची झाडे, दोन आंबा वृक्ष असे एकूण 10 वृक्ष शनिवारी (28 फेब्रुवारी) बेकायदा बुंध्यापासून तोडण्यात आले. स्थानिकांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी ही बाब स्थानिक लोकप्रतिनिधींना कळवली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शिवसेना नगरसेवक राजेश मोरे, भाजपचे प्रदेश शेडगे यांसह शिवसेना-भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवारी प्रसारमाध्यमांसह प्रत्यक्ष पाहणी केली. हे कृत्य नुरी बाबा दरगाह ट्रस्टचे पदाधिकारी आणि नुरी कुटुंबीयांपैकी कुणीतरी केल्याचा आरोप करून महापालिका प्रशासन तसेच पोलिसांनी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## दलित महासंघाच्या जिल्हाध्यक्षांनंतर त्यांच्या सहकाऱ्याची हत्या

# मृतदेह बॅरलमध्ये कोंबून विहिरीत फेकला

■ **सांगली। प्रतिनिधी,**

सांगली शहरात एक धक्कादायक खून प्रकरण उघडकीस आले आहे. दलित महासंघाचे दिवंगत जिल्हाध्यक्ष उत्तम मोहिते यांच्या एका साथीदाराचा निर्घृण खून करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. रोहित म्हैसाळे (वय 29) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. धक्कादायक बाब म्हणजे रोहितचा खून करून त्याचा मृतदेह प्लास्टिकच्या बॅरलमध्ये कोंबून एका पडक्या विहिरीत टाकण्यात आला होता.

**दोन अल्पवयीन ताब्यात**

रोहित म्हैसाळे हा दिवंगत उत्तम मोहिते यांचा जवळचा सहकारी होता. या प्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले असून आणखी एक संशयित आरोपी फरार असल्याची माहिती मिळत आहे. रोहितचे अपहरण करून त्याचा खून करण्यात आल्याची प्राथमिक माहिती पोलिस तपासात समोर आली आहे.



**नागरिकांची मोठी गर्दी**

26 फेब्रुवारी रोजी रोहितचे अपहरण झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यानंतर संशयित आरोपींचे सीसीटीव्ही फुटेजही पोलिसांच्या हाती लागले आहे. मात्र हा खून नेमका कोणत्या कारणातून झाला याबाबत अद्याप स्पष्टता नसून विश्रामबाग पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, स्पेशल रेस्क्यू फोर्स आपत्कालीन पथक, सांगली यांच्या मदतीने विहिरीतून मृतदेह बाहेर काढण्यात आला. यावेळी मृतदेह पाहण्यासाठी परिसरात नातेवाईक व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# सेल्फीसाठी परदेशी महिलेच्या मागे लागले... तिने नकार देताच तरुणांचं ‘ते’ कृत्य!

**महिलेने इंस्टाग्राम पोस्टवर काय म्हटलं?**

इनेस फारिया असं पीडित महिलेचं नाव समोर आलं असून तिने आपल्या इंस्टाग्रामवर व्हिडिओ पोस्ट करताना तिच्या भारतातील वास्तव्यादरम्यान ही घटना घडल्याचं तिने म्हटलं आहे. तसेच, भारतात पहिल्यांदाच तिच्यासोबत ही घटना घडल्याचं ती म्हणाली. याबाबत इंस्टाग्रामवर पोस्ट करताना ती म्हणाली की, ‘‘गेल्या दोन महिन्यांपासून मी भारतात आहे. भारतात माझे बहुतेक अनुभव सुंदर आणि स्वागतार्ह राहिले आहेत. पण हा दिवस वेगळा होता.’’ इंस्टाग्रामवरील तिच्या पोस्टनुसार, तरुणांचा एक ग्रुप तिच्यासह तिच्या साथीदाराचा पाठलाग करत होता आणि तिने नकार देऊनही वारंवार त्यांच्या फोटोंची मागणी करत होता.




■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईच्या महालक्ष्मी परिसरात एका परदेशी महिला पर्यटकाने काही तरुणांवर विनयभंगाचा आरोप केल्याचं वृत्त समोर आलं आहे. संबंधित महिलेने या घटनेचा एक व्हिडीओ सुद्धा शेअर केल्याचं सांगितलं जात आहे. व्हिडिओमध्ये, दोन तरुण 15 मिनिटांपेक्षा जास्त काळ महिलेचा पाठलाग करताना दिसत आहेत आणि तिने नकार देऊन सुद्धा तिला वारंवार सेल्फी घेण्यास सांगत असल्याचं व्हिडीओमध्ये दिसून येत आहे.

**‘‘ते आमच्यावर दबाव टाकत होते...’’**

संबंधित महिला पर्यटकाने याबाबत म्हटलं की, मी सतत नकार देऊन सुद्धा ती मुले आमचा पाठलाग करत होती आणि आमच्यासोबत फोटोंची मागणी करत होती. मला अजिबात कम्फर्टेबल वाटत नव्हतं आणि ते आमच्यावर दबाव टाकत असल्याचं त्या महिलेने सांगितलं. तिने पुढे लिहिलं की ते 15 मिनिटांपेक्षा जास्त काळ ते आमचा पाठलाग करत होते आणि मग अशी वेळ आली की, जागा बनवण्यासाठी तिला त्यांना दूर ढकलून द्यावं लागलं, असं तिने पुढे म्हटलं. संमती आणि वैयक्तिक सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित करताना तिने लिहिलं, "फक्त एक आठवण करून देत आहे की 'नाही' हे एक पूर्ण वाक्य आहे." त्या महिलेने पुढे म्हटले की तुमची सुरक्षितता आणि कम्फर्टला नेहमीच प्राधान्य द्यायला हवं.

# मोबाईल हॅक करून एक लाख लुबाडले

■ **अमरावती। प्रतिनिधी,**

खोलापूरहद्दीत म्हैसपूर येथील व्यक्तीचा मोबाईल हॅक करून त्यांच्या बँकखात्यातून ऑनलाइन ९८ हजार ५०० रुपयांची रोकड परस्पर वापरून ऑनलाइन फसवणूक करण्यात आली. उमेश रामराव ढोके (वय ४५), असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. उमेश ढोके यांच्याजवळ असलेल्या मोबाईलवर फोन पे ॲप होते. त्यावरून ढोके हे आर्थिक व्यवहार करीत होते. त्यांच्या बँकखात्यामध्ये आधी ४५ हजार रुपये होते. शिवाय त्यांच्या शेताचे एक लाख पाच हजार रुपये, असे दीड लाख रुपये होते. त्यापैकी काही त्यातून किरकोळ खर्च उमेश ढोके यांनी केला होता. २८ फेब्रुवारी रोजी साडेपाच ते सहा, या वेळात त्यांचा मोबाईल कुणीतरी हॅक केला होता. त्यावेळेत ढोके यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. त्यांनी फोन पे ॲपचा मॅसेज मोबाईलवर बघितला असता त्यांच्या बँकखात्यातून एका अनोळखी व्यक्तीने ९८ हजार ५०० रुपयांचे कुणाला तरी पेमेंट केले. उमेश रामराव ढोके यांनी सदर घटनेची तक्रार सायबर पोलिसांकडे केली. खोलापूर ठाण्यात ढोके यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# 7 महिन्याच्या बाळाला पाहून मामी झाली सैतान... चिमुरड्याला पाण्याच्या टाकीत बुडवून मारलं

■ **नागपूर। प्रतिनिधी,**

पश्चिम बंगालमधील आसनसोलमधील कुल्ती पोलीस ठाणे हद्दीत बाराकर येथील बालटोडिया वॉर्ड क्रमांक 66 परिसरात धक्कादायक प्रकार उघडकीस आला. मामीने तिच्या 7 महिन्यांच्या लहान भाच्याला पाण्यात बुडवून त्याची हत्या केली. एका पाण्याच्या टाकीत मृतदेह आढळून आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे.

घडलेल्या घटनेनुसार, मुलगा इस्माईल अन्सारी हा नातू होता. इस्माईल अन्सारीची पत्नी गुलशन आरा, त्यांचा मुलगा शाहनवाज अन्सारीची पत्न ी सानिया प्रवीण आणि कुटुंबातील इतर सदस्यांसह राहतात. शाहनवाज अन्सारी सध्या बंगळुरूमध्ये काम करतात, तसेच सानियाला 10 महिन्यांची मुलगी देखील आहे.

इस्माईल अन्सारीची मुलगी मुस्कान खातून हिचे लग्न बालटोडिया येथील रहिवासी मुस्ताफा अन्सारीशी झाले होते. मुस्तफा हा बिहारच्या जमुई येथे चालक म्हणून कार्यरत होता. याचदरम्यान मुस्कान आपल्या 7 महिन्यांच्या मुलासह तिच्या पालकांच्या घरी राहत होती.

**मामीने 7 महिन्याचा बाळाला पाण्याच्या टाकीत बुडवून मारले**

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, आजी-आजोबांनी त्यांच्या नातवावर अधिक प्रेम दाखवले, यामुळे सानिया प्रवीण ही अचानकपणे संतापली, तिने लहान बाळ झोपलेलं असताना त्याला उचलले आणि घरातील पाण्याच्या टाकीत बुडवून मारल्याचा आरोप केला.

**इस्माईल अन्सारी पाण्याच्या टाकीजवळ आल्यानंतर प्रकरण उघडकीस आले**

जेव्हा इस्माईल अन्सारी रोजा सोडवण्यासाठी आणि नमजच्या तयारीसाठी पाण्याच्या टाकीजवळ गेला तेव्हा त्याने मुलाला बुडलेलं पाहिले होते. त्याने ताबडतोब मुलाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आणि कुटुंबाला या प्रकरणाची माहिती दिली होती.



**तेच... कोणाला सांगितल्यास द्यायचा 'ती' धमकी**

संबंधित घटनेची माहिती समजताच, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत शोध सुरु केला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेत जिल्हा रुग्णालयात पाठवला, त्या ठिकाणी शवविच्छेदन सुरु केले. पोलिसांनी सानिया प्रवीण, तिचे आजोबा इस्माईल अन्सारी आणि तिची आजी गुलशन आरा यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. शवविच्छेदन अहवाल आणि चौकशीच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली असून तपास सुरु केला.

# पत्नीची छेड काढणाऱ्या तरुणाची पतीने डोक्यात दगड घालून केली हत्या... आरोपीला वाशिममधून अटक



**हत्येचे कारणः पत्नीची छेड काढणे**

सुरुवातीला टाळाटाळ करणाऱ्या आरोपीने 'पोलिसी खाक्या' दाखवताच आपला गुन्हा कबूल केला. आरोपी ओम केनवडकर याने सांगितले की, मृत राहुल बाजड हा गेल्या अनेक दिवसांपासून त्याच्या पत्नीची छेड काढत होता. आरोपीने त्याला अनेकवेळा समज दिली होती, परंतु राहुलच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही. पत्नीला सतत होणाऱ्या त्रासामुळे आरोपी प्रचंड संतापलेला होता. 3 मार्च रोजी त्याने राहुलला मेहकर शहराबाहेर एका निर्जन ठिकाणी बोलावले आणि रागाच्या भरात त्याच्या डोक्यात मोठा दगड घालून त्याची हत्या केली.

■ **बुलढाणा। प्रतिनिधी,**

पत्नीची छेड काढल्याच्या रागातून एका 38 वर्षीय पतीने एका तरुणाचा डोक्यात दगड घालून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे उघडकीस आली आहे.

या प्रकरणी मेहकर पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपी पतीला वाशिम जिल्ह्यातून बेड्या ठोकल्या आहेत.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, 3 मार्च रोजी मेहकर शहरापासून काही अंतरावर एका शेतात 28 वर्षीय तरुणाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला होता. राहुल भानुदास बाजड (वय 28) असे मृत तरुणाचे नाव आहे. राहुलचा मृतदेह आढळल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच राहुलच्या मामाने मेहकर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. आपल्या भाच्याची हत्या करण्यात आली असून, संशयास्पद व्यक्तीबाबतही त्यांनी पोलिसांना माहिती दिली.

**पोलिसांचा तपास आणि फॉरेन्सिक टीम पाचारण**

घटनेचे गांभीर्य ओळखून मेहकर पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठले. मृतदेहाची पाहणी केली असता, राहुलचा चेहरा आणि डोके मोठ्या दगडाने ठेचून त्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवला. या गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी फॉरेन्सिक टीम आणि श्वान पथकालाही पाचारण केले होते. तांत्रिक पुरावे आणि मृताच्या नातेवाईकांनी व्यक्त केलेल्या संशयावरून पोलिसांनी तपासचक्र वेगाने फिरवले.

**आरोपीला वाशिममधून ठोकल्या बेड्या**

मृताच्या मामाने ज्या व्यक्तीवर संशय व्यक्त केला होता, तो आरोपी ओम शामराव केनवडकर (वय 38) हा घटनेनंतर फरार झाला होता. पोलीस त्याचा शोध घेत असताना तो वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील केनवड गावातील आपल्या शेतात लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून त्याला तिथून ताब्यात घेतले.

**पुढील पोलीस कारवाई**

मेहकर पोलिसांनी आरोपी ओम केनवडकर विरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. मृत राहुल बाजड याचे शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास मेहकर पोलीस करत आहेत.

## मुंबई-अहमदाबाद हायवेवर बर्निंग ट्रकचा थरार

# ड्रायव्हरचा केबिनमध्येच होरपळून मृत्यू... व्हिडिओ

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मध्यरात्रीच्या सुमारास एक भीषण दुर्घटना घडली. पालघरमधील सोमटा परिसरात एका धावत्या ट्रकला अचानक आग लागल्याने ट्रकचालकाचा जागीच होरपळून मृत्यू झाला, तर क्लिनर गंभीर जखमी झाला आहे. या भीषण दुर्घटनेचा थरार कॅमेऱ्यात कैद झाला असून, याचा व्हिडिओ पाहून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



**ट्रक आगीच्या भक्ष्यस्थानी**

हा ट्रक मुंबईहून अहमदाबादच्या दिशेने जात होता. महामार्गावरून जात असताना समोर असलेल्या एका वाहनाला ट्रकची जोरात धडक बसली. ही धडक इतकी भीषण होती की, धडक लागताच ट्रकला अचानक आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण केले आणि ट्रक आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.

**चालकाचा दुर्दैवी अंत**

ट्रकला लागलेली आग इतकी वेगाने पसरली की, चालक केबिनमध्येच अडकून पडला. आग इतकी भीषण होती की चालकाला बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही आणि त्याचा जागीच होरपळून मृत्यू झाला. यावेळी ट्रकचा क्लिनर बाहेर पडला, मात्र तोदेखील गंभीररीत्या भाजला असून त्याच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com